विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २०१४ |
| वर्ष | : | पंधरावे |
| अंक | : | ६ |
| पृष्ठे | : | ४४ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या “ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१३**

**गणपत्रिका क्रमांक : २०२**

MAHMARI 19358/13/1/2000-TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

# व्ही. पी. एम्. दिशा

वर्ष पंधरावे / अंक ६ / जून २०१४

## संपादकीय

### उत्क्रांती मानवाची

आदिमानव ते आजचा मानव, या प्रवासाचा इतिहास हा जेवढा उद्‌बोधक आहे, तेवढाच मनोरंजकही आहे. विज्ञानामधे शेवटचे उत्तर केव्हाच सापडलेले नसते, म्हणून ''आजचा मानव का व कसा?'' या प्रश्नाचे अंतिम उत्तर आजही सापडलेले नाही. ज्या गतीने या अभ्यासाकरता आवश्यक साधने आणि माहिती उपलब्ध होत आहे, तेवढा हा प्रश्न अधिक जटिल व गुंतागुंतीचा बनत आहे.

१८५९ साली डार्विन या वैज्ञानिकाने उत्क्रांतिवाद मांडला, आणि या अभ्यासाला एक नवीन कलाटणीच मिळाली. डार्विनच्या आधी, मानवाच्या अस्तित्वासंबंधीचे विचार हे अनेक धर्मग्रंथांवर आधारित होते. बाह्यलक्षणी त्यामध्ये काही साम्ये जरी आढळली, तरी ती विसंगतीने भरलेली होती. धर्मग्रंथांपलीकडे विज्ञानाला हवा असलेला प्रत्यक्ष पुरावा किंवा आधार या कुठल्याच ग्रंथांमधून मिळत नव्हता. डार्विनने अनेक सजीव जाती आणि जीवाश्मांचा तौलनिक अभ्यास करून आपला उत्क्रांतिवादाचा सिद्धान्त मांडला. आजच्या सजीव जातींमधे मानव हा आपल्या वैशिष्ट्यांनी जरी श्रेष्ठ ठरत असला, तरी डार्विनच्या उत्क्रांतिवादामुळे सृष्टीच्या निर्मितीच्या इतिहासामधील मानवकेंद्रितपण त्यामुळे नष्ट झाले. डार्विनने अनेक निरीक्षणांतून दाखवून दिले की, एकपेशीय जातीपासून, जलचर ते भूचर प्राण्यांच्या सगळ्या अवस्थांमधून विकसित होत आजचा मानव निर्माण झाला. यामुळेच माकड हासुद्धा आजच्या मानवाचा एक पूर्वज ठरतो. अनेक धर्मांना, विशेषतः ख्रिस्ती धर्माला डार्विनचा उत्क्रांतिवाद मान्य नाही. मानवासकट सर्वच सजीव, निर्जीव सृष्टी ही देवांनी निर्माण केली हाच त्यांचा ठाम विश्वास आहे. युरोप आणि अमेरिकेमधे अनेक सुशिक्षित संशोधकही डार्विनच्या उत्क्रांतिवादावर आक्षेप घेऊन, देवनिर्मित सृष्टीच्या निर्मितीलाच मान्यता देताना दिसतात. हा संघर्ष दिसतो तेवढा साधा नाही, पण एका अर्थाने या संघर्षामुळेच उत्क्रांतिवादाच्या अभ्यासाला प्रचंड चालना मिळत राहिली. सुदैवाने मूळ प्रवाहातील बहुसंख्य वैज्ञानिकांना उत्क्रांतिवाद मान्य आहे. हे जरी खरे असले, तरी या विकासाच्या अनेक टप्प्यांवर संदिग्धता आणि अस्पष्टता आहे. डार्विननंतरच्या १५० वर्षांमध्ये ही अस्पष्टता कमी झाली असे वाटत असले, तरी विज्ञानानेच दिलेली नवीन दृष्टी आणि नवीन साधनांमुळे उघडकीस आलेल्या अनेक टप्प्यांमध्ये अजूनही तेवढीच संदिग्धता आहे.

(पृष्ठ क्र २ वर)

(मुखपृष्ठावरून – **संपादकीय**)

डार्विनपासून ते अगदी २० व्या शतकाच्या मध्यापर्यंत, प्राणी आणि मानवांचे उत्खननांत मिळालेले सांगाडे आणि जीवाश्म यांच्या निरीक्षणातून उत्क्रांतिवादात सुसंगती आणणे एवढेच शक्य होते. सूक्ष्मदर्शक यंत्राच्या उपलब्धीनंतर या अभ्यासाला एक नवीन गती मिळाली, पण या अभ्यासामध्ये खरे क्रांतिकारक परिवर्तन हे १९५३ साली वॅटसन (James Watson – १९२८ ते –) आणि क्रिक ( Francis Crick – १९१६ ते २०१४) यांच्या डी. एन. ए. (DNA) च्या रचनेच्या शोधामुळे झाले. जैवविज्ञानाच्या अभ्यासामध्ये यामुळे आमूलाग्र बदल घडू लागले. जननविज्ञान (Genetics) हे या सगळ्या अभ्यासांचे प्रमुख केंद्र बनले. १९७८ साली एडवर्ड (Robert Edward - 1925-2013) आणि स्टेप्टो (Patricle Steptoe - 1913-1988) या संशोधकांनी ''लुई ब्राउन'' (Louise Brown) या बालिकेला कृत्रिम गर्भधारणेतून जन्म मिळवून दिला आणि एका नवीन युगाला सुरुवात करून दिली. मानवाच्या निर्मितीमध्ये यामुळे प्रथमच विज्ञानाचा हस्तक्षेप चालू झाला आणि नैसर्गिक गर्भधारणेप्रमाणेच अनैसर्गिक गर्भधारणेतूनही मानवाची निर्मिती होऊ लागली. याच्याच पुढचे टप्पे म्हणजे क्लोनिंग (Cloning) आणि स्टेमसेल (Stemcell) या संशोधनामुळे, मानवाच्या निर्मितीतील अनेक अकल्पित गोष्टी शक्य होत गेल्या. मानवाच्या या 'अकृत्रिम' साधनांनी झालेल्या निर्मितीचे त्याच्यापुढील उत्क्रांतटप्पयावर काय परिणाम होणार आहेत हे मात्र काही शतकांनंतरच कळणार आहे. अजूनपर्यंतच्या मानवनिर्मितीच्या अभ्यासामध्ये मानवी सांगाडे, जीवाश्म आणि नंतर जननविज्ञान यांच्या तौलनिक अभ्यासापर्यंतच ही निरीक्षणे मर्यादित आहेत.


मानवाच्या भाविक व सर्जनतेमुळे निर्माण झालेल्या सामाजिक, सांस्कृतिक अंगांचा यामध्ये अजिबात विचार केला गेला नव्हता. याचेच महत्त्वाचे आणखी एक अंग म्हणजे त्याची 'भाषा' क्षमता. या सगळ्या अंगाचा अभ्यास समाजशास्त्र, मानसशास्त्र आणि मानववंशशास्त्र या विज्ञानाच्याच पण संपूर्णतः वेगळ्या 'मानव्य' विज्ञान शाखेत केला जातो. परंपरागत आजच्या मानवाच्या उत्क्रांतीच्या अभ्यासामध्ये याचा विचार अजिबात झाला नव्हता. माणसाच्या अनेक 'मानव्य' अंगांचा उगम आणि विकास हा त्याच्या मेंदूमध्ये होतो, या नात्याचा विचारही या 'उत्क्रांती' अभ्यासामध्ये फारसा प्रतिबिंबित होत नव्हता.

विज्ञानाच्या वेगवेगळ्या कप्प्यांमध्ये होत असलेल्या या अभ्यासाला २० व्या शतकाच्या उत्तरार्धात 'जैव सामाजिकी' (Socio-Biology) या नवीन विज्ञानशाखेने मोठी कलाटणी दिली. एडवर्ड विल्सन (Edward Wilson) या संशोधकाने १९७५ साली या विषयावर एक पुस्तक लिहून या अभ्यासाचे नवीन दालन खुले केले. जननशास्त्रामुळे वंशवाद बळकट होतो असा एक प्रवाह समाजशास्त्रज्ञांमध्ये प्रभावी होता. अर्थातच या जननविज्ञानामुळे माणसाची वर्तणूकच नाही तर त्याचे अनेक रोग, आवडी-निवडी इत्यादींचा संबंध, आणि आनुवंशिकतेचा प्रभाव विज्ञानाला नाकारणे अशक्य होते. परंपरागत पुरातत्त्व आणि संलग्न शाखांमध्ये, उत्खननातून मिळालेले सांगाडे, अवजारे आणि जीवाश्म यांची संख्या, लांबी-रुंदी, उंची, भौगोलिक परिसर यांच्या निरीक्षणावर संशोधन अवलंबून होते. लवकरच 'काल'मापनाची जैविक साधने उपलब्ध झाल्यावर व्यापक कालपटावरील त्यांचे 'वय'ही

(पृष्ठ क्र २७ वर)

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष पंधरावे / अंक ६ / जून २०१४

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १८ वे/अंक १२ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. विजय बेडेकर | |
| २) | ब्राझीलमध्ये संपन्न झालेली विज्ञान तंत्रज्ञान जत्रा | डॉ. सुधाकर आगरकर | ३ |
| ३) | नर्मदा परिक्रमा (भाग : ५) | श्री. अरविंद ओक | ७ |
| ४) | श्रीमत् भगवद्गीता - अध्याय सतरावा दैवी आणि आसुरी संपन्न विचार | कै. शं. बा. मठ | १२ |
| ५) | भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १६ |
| ६) | नूपुर डंख | श्रीमती आशा भिडे | २१ |
| ७) | ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत निष्काळजीपणा आणि चिकित्सक / वैद्य यांची मर्यादित जबाबदारी | सौ. श्रीविद्या जयकुमार | २४ |
| ८) | बखर | | २९ |
| ९) | विज्ञानदिन विशेष | संकलित | ३४ |
| १०) | ध्यानीमनी ते स्वप्नी , थोडी खंत | वसुमती वझे | ३६ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३७ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगीमूल्य द्या व इतरांना द्यायला सांगा.
- आपले देणगीमूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगीमूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेचे देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगीमूल्याचा रु. २५०/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.


- संपादक

# ब्राझीलमध्ये संपन्न झालेली विज्ञान तंत्रज्ञान जत्रा

*ब्राझीलमध्ये भरलेल्या विज्ञान तंत्रज्ञान स्पर्धेत भाग घेण्याचा मान भारताला पहिल्यांदाच मिळाला. त्या जत्रेतील अनुभव विशद करणारा लेख – संपादक*

ब्राझील हा प्रगतीच्या वाटेवर वेगाने मार्गक्रमण करीत असलेला देश. मागील काही वर्षांत या देशाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात नेत्रदीपक अशी प्रगती केलेली आहे. त्याचबरोबर, या विषयाची गोडी शालेय विद्यार्थ्यांमध्ये निर्माण व्हावी यासाठी या देशात दर वर्षी विज्ञान तंत्रज्ञान जत्रा आयोजित करण्यात येते. ब्राझील देशाच्या दक्षिणेला असलेल्या नोव्हो हॅम्बुर्गो (Novo Hamburgo) या शहरात अशी जत्रा मागील २७ वर्षांपासून भरविली जाते. २८ वी जत्रा याच शहरात ऑक्टोबर २१ ते २५, २०१३ या कालावधीत भरविण्यात आली होती. आयोजकांच्या निमंत्रणावरून या जत्रेत सहभागी होण्याची आम्हांला संधी मिळाली. त्या जत्रेतील अनुभव या लेखात देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

फंडासाव लिबरॅटो (Fundasao Liberato) या नावाची तांत्रिक शिक्षण देणारी एक संस्था या गावात आहे. या संस्थेने विज्ञान तंत्रज्ञान जत्रेची सुरुवात २८ वर्षांपूर्वी केली. सुरुवातीच्या काळात ही जत्रा त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांपुरती मर्यादित होती. काही वर्षांनंतर शहरातील इतर शाळांना सहभागी करून घेण्यात आले. शहरापुरती मर्यादित असलेली ही जत्रा लवकरच राज्यस्तरीय आणि कालांतराने राष्ट्रस्तरीय जत्रा झाली. एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीपासून ही जत्रा आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित केली जात आहे. वेगवेगळ्या देशांतील विज्ञान संघटनांशी संपर्क साधून त्यांना या जत्रेत सहभागी होण्याचे निमंत्रण दिले जाते. २८ व्या जत्रेत एकूण २६ देशांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. भारताचा या जत्रेतील सहभाग पहिलाच होता. विद्या प्रसारक मंडळाच्या सौ. ए. के. जोशी इंग्रजी माध्यम शाळेतील एक विज्ञानप्रकल्प घेऊन आम्ही या जत्रेला गेलो होतो.



**विज्ञान प्रतिकृती**

२६ देशांतील एकूण ४१२ प्रकल्प या जत्रेसाठी आले होते. त्याचबरोबर काही उद्योगांचे या जत्रेत स्टॉल्स होते. याखेरीज विद्यापीठांनी आपली माहिती देण्यासाठी स्टॉल्स उभारले होते. जत्रेला भेट द्यायला येणाऱ्या लोकांच्या मनोरंजनाचीदेखील पुरेशी सोय केलेली होती. एक स्वतंत्र रोबोटिक्स विभाग या जत्रेत होता. त्या सर्वांसाठी खूप मोठ्या जागेची गरज होती. म्हणून जत्रेचे आयोजन एका प्रदर्शन केंद्रात केलेले होते. हे केंद्र नगरपालिकेच्या मालकीचे असून दोन मजल्यांवर पसरलेले आहे. त्यात प्रदर्शनासाठी प्रशस्त असे दालन आहे. तसेच इतर बाबींसाठी पुरेशी जागा उपलब्ध आहे. त्याचबरोबर एक प्रशस्त असे सभागृहदेखील या केंद्रात आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे प्रदर्शन केंद्राच्या बाहेर वाहने उभी

करण्यासाठी मोठी जागा उपलब्ध आहे. या सुविधांमुळे प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या आणि प्रदर्शन पहायला येणाऱ्या लोकांची संख्या मोठी असूनदेखील गर्दी जाणवत नव्हती. सगळे कसे शांतपणे आणि सुरळीत चालले होते.



**प्रदर्शनस्थळ**

प्रदर्शनाचे आयोजन करणे हे एक मोठे आव्हानच होते. जगाच्या वेगवेगळ्या भागांतून येणाऱ्या लोकांना विमानतळावर, रेल्वे स्टेशनवर, बस स्टॅण्डवर घेणे, त्यांची राहण्याची व्यवस्था करणे, त्या सर्वांना त्यांच्या राहण्याच्या ठिकाणापासून सकाळी प्रदर्शनस्थळापर्यंत नेणे आणि संध्याकाळी परत आणणे अशा अनेक प्रकरची कामे आयोजकांना करावी लागत होती. या सगळ्या बाबी त्यांनी अगदी समर्थपणे हाताळल्या. कठीण समस्या होती ती वेगवेगळ्या भाषा बोलणाऱ्या लोकांच्या गरजा पूर्ण करण्याची. ब्राझीलवर पोर्तुगीजांचे बरीच वर्षे राज्य होते. त्यामुळे तेथे पोर्तुगीज भाषा बोलली जाते; परंतु प्रदर्शनात आलेले लोक तर वेगवेगळी भाषा बोलणारे होते. त्यांना त्यांच्या भाषेत समजावून सांगण्यासाठी आयोजकांनी दुभाष्यांची सोय केलेली होती. याखेरीज भाषेची समस्या सोडविण्यासाठी एक वेगळा बूथ ठेवलेला होता. सचिवालय, दळणवळण व्यवस्था, मदत केंद्र यांचेदेखील बूथ होते. प्रदर्शनात सहभागी झालेल्या लोकांना तत्काळ माहिती उपलब्ध व्हावी यासाठी एक स्वतंत्र इंटरनेट केंद्र उभारले होते. प्रत्येक सभासदाला तेथे मोफत प्रवेश असून प्रत्येकाने फक्त १५ मिनिटेच इंटरनेटचा वापर करावा असे बंधन घातले होते. सगळ्यांत उत्तम बडदास्त होती ती जेवणाची. प्रत्येक सहभागी सभासदाला एक ओळखपत्र दिले होते. त्यावरच बारकोड छापलेले होते. या बारकोडची संगणकाने छाननी करूनच प्रत्येकाला भोजनगृहात पाठविले जायचे. तेथील जेवणदेखील बरेचसे भारतीय पद्धतीचे होते. त्यामुळे आमची खाण्यापिण्याची मुळीच गैरसोय झाली नाही.



**प्रदर्शन दालन**

एका प्रशस्त अशा सभागृहात जत्रेची सुरुवात झाली. सर्व स्पर्धकांना एकत्र बोलावून त्यांना काही सूचना देण्यात आल्या. त्या सूचना प्रामुख्याने सुरक्षेसंबंधी होत्या. आपला प्रकल्प सादर करताना प्रत्येकाने कोणती काळजी घ्यावी याबद्दल तेथे सविस्तर माहिती देण्यात आली. प्रकल्पाचे दिग्दर्शन करीत असताना कोणाला इजा होणार नाही याची काळजी घेण्याचे ते पुन्हा पुन्हा आवाहन करीत होते. एवढ्यावरच न थांबता प्रत्येक प्रकल्प पाहून त्यात धोकादायक काहीही नाही ना याची त्यांनी खात्री करून घेतली. त्यानंतर तसे प्रमाणपत्र त्यांनी दिले. याखेरीज प्रदर्शनात आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही याची खबरदारी घ्या हे सांगायला ते विसरले नाहीत.

आपले अस्तित्व हे आपल्याच विचारांचे मूळ असते.

सूचना देऊन झाल्यावर जत्रेचे उद्घाटन करण्यात आले. हा सोहळा अतिशय साध्या पद्धतीने प्रदर्शन दालनातच करण्यात आला. एक छोटासा मंच आणि त्यासमोर लावलेले सहभागी देशांचे ध्वज एवढीच काय ती सजावट. उद्घाटनकर्ते मंचावर उभे राहिले. त्यांचे नाव पुकारताच ते पुढे येऊन आपली मते व्यक्त करीत असत. सगळा समारंभ पोर्तुगीज भाषेत चालला असल्याने आम्हांला ते काय बोलत आहेत हे कळत नव्हते. तरीही उद्घाटन सोहळा आटोपशीर केल्याचे जाणवत होते. पुढे आलेल्या प्रत्येक पाहुण्याने आपले म्हणणे मोजक्या शब्दांत मांडून आपले भाषण थोडक्यात उरकले. थोड्याच वेळात उद्घाटनाचा कार्यक्रम आटोपला. आपल्या देशात होणारे उद्घाटन सोहळे हारतुरे आणि मानापमान या बाबींनी परिपूर्ण असतात. त्या पार्श्वभूमीवर हा कसला उद्घाटन सोहळा असा विचार आमच्या मनात आल्यावाचून राहिला नाही. आपण असे आटोपशीर उद्घाटन सोहळे करायला कधी शिकू हा प्रश्न मात्र मनात शिल्लक राहिला.



**सुटसुटीत उद्घाटन सोहळा**

ठाण्याच्या सौ. ए. क. जोशी शाळेच्या नववीच्या दोन मुलांनी विकसित केलेला प्रकल्प घेऊन आम्ही गेलो होतो. त्या प्रकल्पाचे नाव 'पाण्यावर चालणारी कार' (Hydro Powered Car). प्रकल्पामागची कल्पना तशी साधीच होती. सूर्यप्रकाशाचा उपयोग करून वीज निर्माण करायची व ती बॅटरीमध्ये साठवून ठेवायची. या बॅटरीच्या मदतीने मोटर सुरू करून पाण्याचा झोत निर्माण करायचा. हा झोत एका चाकावर सोडून ते चाक फिरवायचे. अशा प्रकारे निर्माण झालेल्या गतीने वाहन चालवायचे आणि त्याच वेळेस जास्तीची वीजदेखील निर्माण करून साठवून ठेवायची अशी ही कल्पना होती. त्यासाठी कारची एक सुंदर प्रतिकृती मुलांनी तयार केली होती. याखेरीज वरील तत्त्वाचा उपयोग करून ती कार ते प्रत्यक्ष चालवून दाखवीत असत. त्यामुळे या प्रकल्पापुढे सतत गर्दी असायची. आमच्या प्रकल्पापुढे गर्दी आणि आजूबाजूच्या प्रकल्पांपुढे शुकशुकाट असे चित्र सतत दिसायचे. आमच्या विद्यार्थ्यांनी केवळ प्रेक्षकांचीच मने जिंकली असे नाही तर त्यांनी परीक्षकांचीदेखील मने जिंकली. म्हणूनच आमच्या प्रकल्पाला विशेष सन्मानपदक देऊन गौरविण्यात आले.



**प्रकल्पाची माहिती घेताना ब्राझीलियन विद्यार्थी**

दक्षिण अमेरिकेच्या विज्ञान तंत्रज्ञान स्पर्धेत भाग घेण्याची ही आमची पहिलीच वेळ होती. स्पर्धेचे स्वरूप, प्रकल्पांचे मूल्यमापन करण्याची त्यांची पद्धत हे सगळे आमच्यासाठी नवीनच होते. याखेरीज लांबचा विमानप्रवास करून येणारा शीण जाण्याच्या आधीच स्पर्धेला सुरुवात होणार होती. भारत आणि ब्राझील यांमध्ये

तब्बल साडेआठ तासांचा फरक आहे. त्या बदलालादेखील जुळवून घेणे आवश्यक होते. या सर्व समस्यांवर आम्हांला मात करता आली याचा आनंद आहे. नोव्हो हॅम्बुर्गो हे गाव तसे लहानच आहे. चामडी वस्तूंचा व्यवसाय येथे मोठ्या प्रमाणावर चालतो. १९३० च्या जागतिक मंदीमध्ये काही जर्मन लोक येथे येऊन स्थायिक झाले. त्यांनी या व्यवसायाला दिशा दिली. आजच्या घडीला या लहानशा गावातून मोठ्या प्रमाणावर बूट आणि चपलांची निर्यात होते. याखेरीज आणखीही काही उद्योगधंदे या शहरात आहेत. वेळेच्या अभावामुळे ते सगळे आम्हांला पाहता आले नाहीत. तरीही दक्षिण अमेरिकेच्या विज्ञान तंत्रज्ञान स्पर्धेत भारतीय ध्वज पहिल्यांदा फडकवू शकलो या समाधानाने आम्ही शहराचा निरोप घेतला.



**दक्षिण अमेरिकेच्या विज्ञान जत्रेत भारतीय ध्वज प्रथमच झळकला**

**डॉ. सुधाकर आगरकर**

विद्या प्रसारक मंडळ,

ठाणे

●●●

## *एक झाड*



१. एक पूर्ण वाढलेलं झाड आपल्याला कमीत कमी सहा लाख रुपयांचा ऑक्सिजन देतं.
२. तेच झाड आपल्या राष्ट्राच्या आर्थिक संपत्तीत तीन ते पस्तीस लाखांची भर टाकतं.
३. एका मोठ्या झाडाच्या आश्रयाला दीडशेहून अधिक सजीव येत असतात.
४. लहान-मोठे कीटक, पक्षी, मुंग्या, जनावरं कितीतरी अवलंबून असतात त्यावर. त्यांची किंमत अडीच लाखांहून अधिक.
५. एक झाड जमिनीची धूप थांबविण्यात, पोत सुधारण्यात अडीच लाखांहून अधिक किमतीची मदत करतं.
६. तेच झाड पाण्याची आर्द्रता टिकवण्यात, नैसर्गिक संतुलन साधण्यात महत्त्वाचं काम करतं.
७. एका झाडापासून सरपण, मध, फळं वगैरे असे दोन लाखांहून अधिक रकमेचे फायदे होऊ शकतात.
८. तेच झाड २०,००० रुपयांच्या प्रथिनांचं उत्पादन करतं.
९. त्यासाठी किमान एक तरी झाड लावावं...व ते पूर्ण वाढू द्यावं.

**संदर्भ** : पर्यावरण
डॉ. अमित मुल्लेमवार, नागपूर, पृ. १२०.
दर्भ प्रकाशन १९९०
(या माहितीतील किमतीचे आकडे २०-२५ वर्षांनंतर किती बदलले असतील? – **संपादक**)

# नर्मदा परिक्रमा

**भाग : ५**

*नर्मदा परिक्रमेतील हा पुढचा टप्पा. लेखकाचे चौफेर निरीक्षण, भेटलेली माणसे या नोंदी वाचण्यासारख्या आहेत – संपादक*

**दिवस १९ वा, देडियापाडा – खुटा आंबा २४ कि.मी. मुक्काम : हनुमान मंदिर**

काल रात्री भरपूर थंडी होती. सकाळी दिवेही नव्हते. आश्रम हमरस्त्याला लागून असल्याने रात्रभर वर्दळ होती. थंडीमुळे रात्री २।। आणि पहाटे ४।।। वाजता लघुशंकेसाठी उठावे लागले. रात्री २।। लाही बाहेर जाग होती आणि पहाटे तर डोक्यावर मोळ्या घेऊन अंधारातच आदिवासी देडियापाड्याकडे हारीने जाताना दिसले. नंतर वाटेतही महिला डोक्यावरून सरपण वाहताना दिसल्या. वजन ४०/५० किलो असावे हे एक मोळी अजमावून पाहिल्यावर उमगले.

सकाळी निघायला ६।।। वाजले. पुढे शहर होते तिथे बुटांसाठी इनर सोल घेतले. नाक्यावरून मोही मार्ग धरला व हळूहळू पर्वतराजीमध्ये शिरलो.

वड, औदुंबर, साग, पळस, आंबा यांसह निलगिरी, बांबू वने होती. बांबू विपुल असल्याने घरांच्या भिंती, छपरे, कुंपणे एवढेच नव्हे तर चहा टपऱ्यांना बांबूच्या तरत्या खाटा (बैठक) तयार करून वापरल्या होत्या.

महाराष्ट्रात करवंदाच्या जाळ्या दिसतात. इथे मात्र करवंद, कडुनिंब रानात आढळला नाही. घरासमोर शेवगा मात्र बऱ्याच ठिकाणी दिसला. घरांना अंगणाची शोभा होती. भारण, झेंडू, मधुमालती, बोगनवेल, बांबू हे बऱ्याच जणांच्या अंगणात पाहिले. अगदी आदिवासी मात्र या प्रकारच्या सजावटीत रस घेत नसावेत.

४ तासांनी ही जंगलची मौज व सावली संपली आणि उन्हाने प्रताप दाखविण्यास सुरुवात केली. रस्त्यामध्ये जागोजाग खडीचे ढिगारे होते, ते रस्त्याच्या कामासाठी. त्यामुळे अर्धा रस्ता बंद होता.



आज शक्करखोरा, शिंपी पक्षी यांबरोबर बुलबुल, वेडा राघू पाहिला. वाटेत नदीवर पाणकोंबड्या आणि पूर्वी खंड्याही दिसला होता. Wag Tail पक्षीही आढळले.

वनखात्याने तारांच्या कुंपणाप्रमाणे दगडांचा वापर करून कोकणाप्रमाणे गडगेही बांधलेले दिसले.

साडेअकरानंतर भोजनाची चिंता लागली. वाटेत कितीतरी तास काहीच मिळण्याची शक्यता नव्हती. नंतरही रस्त्यावर स्टॉप, परंतु गाव ३ कि.मी. आतमध्ये. जिथे जिथे शक्य तिथे सरळ नन्नाचा पाढा किंवा घरात कुणीच नाही!

ऊन रणरणत होते. बारा वाजता मी अशोकला म्हटले, 'आज आपल्याला दुपारचे जेवण मिळण्याची शक्यता दिसत नाही.' अशोक म्हणाला,'अर्ध्या तासात जेवण मिळेल.' मी साडेअकरापासूनच मैय्याची आळवणी करत होतो. ऊन त्रासदायक होते. झाडांची सावली अधेमध्ये अगदी तुरळक. सडक संपून कधीच मातीमय रस्ता लागला होता. साडेबारा वाजता एका वळणावर

टेकडीवजा उंचवट्यावर एक घर दिसले व एक आकृतीही दिसली.

आम्ही जणू हक्काने तिथे गेलो ते ठरवूनच. पैसे देऊ, परंतु खिचडी करा हे सांगण्यासाठी! भोजन मिळेल ऐकल्यावर जीव भांड्यात पडला. कुणीतरी चुलीपाशी होते. पोळ्या आहेत कळल्यावर आहे ते चालेल असे सांगितले.

घरातल्यांची (३ स्त्रिया+ कुणीतरी) जेवणे झाली होती. दोन पोळ्या शिल्लक आहेत त्या वाटून घ्या असे सांगून जेवण आले. दोनऐवजी तीन भाकऱ्या व मटाराची वाटावी अशी बहुधा चवळीची लज्जतदार उसळ. तीही तिघांना पुरेल इतकीच!

अगदी घरच्या चवीचे भोजन झाले. आम्हांला दिसलेली आकृती म्हणजे पूनम (देवी) होती. चुलीपाशी तिची मुलगी सुमित्रा होती व म्हातारी (आजी) भंगरीदेवी होती. निघताना आम्हांला भुईमुगाच्या शेंगाही दिल्या. हे आदिवासी, पण शेतकरी कुटुंब आहे. अर्ध्या रस्त्यावर खडी टाकून त्यावर दगडी पूड (Stone Powder) टाकून दाबली आहे, परंतु वाहने गेल्यावर प्रचंड धूळ उडते.

भर उन्हातून वाटचाल सुरू. करझन नदीवर २०० मीटर लांबीचा उंच पूल बांधला आहे (२००८). आता ताडाची झाडे बऱ्याच प्रमाणात दिसली. एक माडही दिसला. शेताच्या कुंपणाला निवडुंगही मोठ्या प्रमाणात प्रथमच पाहिला.

कापसाचे पीक दिसले, परंतु रोपे खुरटी व कापूस फार मोठी फुले नाहीत असा. मका बऱ्याच ठिकाणी, परंतु ऊस मात्र दिसला नाही.

बऱ्या टेकड्यांची अवस्था बावनगजा भागातील बोडक्या आणि पठारी निष्पर्ण माळांसारखी झाली आहे. ज्या वनरात्रीतून आम्ही आलो त्याचाच भाग आहे हा. बहुधा असलेली झाडे पूर्ण नष्ट केल्याने/झाल्याने ही अवस्था झाली असावी.

निघाल्यापासून ११ तासांनी म्हणजे ५ ।।। नंतर खुटा आंबा येथील हमरस्त्यावरील हनुमान मंदिर लागले. दरम्यान मोठी मार्गे येणारा रस्ता मोठ्या हायवेला मिळतो. तेथून हे स्थान तीन कि.मी. असावे.



संदीप, किसन व सतीश – १६, १४, १३ या बालवीरांनी आम्हांला चविष्ट खिचडी करून घातली. ही तीनही मुले फार चटपटीत व उत्साही आहेत. आरत्या ढोलकीच्या तालावर म्हणणे हेसुद्धा काम याच तिघांचे. रात्री भरपूर थंडी होती.

राजपिपलाच्या पुढे रस्त्याच्या कडेला भरपूर, कडुनिंबाचे वृक्ष दुतर्फा आढळले.

**दिवस २० वा : खुटा आंबा – राजपिपला २५ किमी. मुक्काम : हरसिद्धी आश्रम**

सकाळी ६ । वाजता हायवेने निघालो. रस्ता अतिशय भव्य, सुंदर आणि छान,नवीनच केलेला वाटला. डोंगरटेकड्या कापून हे घाट कसे करतात हे एक नवलच आहे.

आज बरेच पोपट पाहिले. रानातही शेवग्याची खूप झाडे पाहिली. सगळी फुलावर आली होती. काल तर पानगळीचा संथ, पण सतत वर्षाव पाहत आलो होतो. त्यातून सागाचे पान पडले की जरा भीतिदायक आवाज येतो (लक्ष नसेल तर घाबरायला होते.).

गुरुमुखातून बाहेर पडणारी वाणी ही सत्यवाणीच असते याची प्रचिती गुरुचरणी संपूर्ण निष्ठा ठेवलीत की आपोआप येते.

वाघ, चित्ता, बिबट्या, रानमांजर, पाणमांजर, कोल्हा, पट्टेरी तरस, लांडगा, मधुचारे इत्यादी अनेक प्राणी असल्याची चित्रे वनखात्याने जागोजाग लावली आहेत, परंतु आम्हांला आजवर एकही जंगली प्राणी किंवा साप दृष्टीसही पडलेला नाही.

बांबू विपुल असल्याने वनखात्यानेही संरक्षण कुंपणांसाठी बांबूच्या पट्ट्या वापरलेल्या दिसल्या.

हायवेवर अनेक ठिकाणी चहाच्या टपऱ्या आहेत. चहा चुलीवर होतो व त्यासाठी Blower वापरला जातो. बालाजी किंवा गोपालन् (गोपाल) या कंपन्यांची ५/५ रु. ची खाद्य पाकिटे टांगलेली असतात. शिवाय ग्लुकोज, २०-२०, मोनॅको ही बिस्किटे मिळतात. काही ठिकाणी ग्लास, कपबशी तर बव्हंशी प्लास्टिकचे ४० मिलीचे कप चहासाठी असतात. बहुतेक ठिकाणी चिक्की, नानकटाई, शेव, फरसाण विक्रीसाठी असते.

पैसे देऊनही इथे कुणी तुमच्यासाठी भोजन तयार करत नाही, कारण दोन तीन कि.मी. आत असलेल्या गावातून तो केवळ चहा ठेला चालविण्यासाठी हायवेला येऊन बसतो व रात्री परत जातो.

ठाणे-पुणे जुन्या महामार्गावर पूर्वी कितीतरी ढाबे होते. त्यांची मला आठवण झाली. इथे रस्ता नवा आहे म्हणून की हा भागसुद्धा शूलपाणी जंगलाचाच आहे म्हणून धाबा नसावा? कल्पना नाही, परंतु वास्तव आहे.

हायवेवर घरे नाहीत, चहाच्या टपऱ्या जेवण बनवीत नाहीत त्यामुळे आत भोजन मिळणार नाही, असे वाटत होते. वेळ होती ११ ।। ची. अशोक म्हणाला, 'कालच्याप्रमाणे आजही तासाभरात जेवण मिळेल.'

त्याचे बोल खरे ठरले. रस्त्यात कुणी ड्रायव्हरने सांगितलेल्या ढाब्याच्या शोधात आम्ही एका नाक्यावर आलो. ती ट्रॅफिक पोलीस चेक पोस्ट होती. तेथील बाकड्यावर मी विसावलो. अशोक चौकशीला गेला आणि खरोखर मातृपितृछाया या वास्तूच्या लगतच्या शेणाने सारविलेल्या घरात रोटी, भाजीची सोय झाली.

अगोदर अशोकला नकारच मिळाला होता. अशोक मागे फिरला आणि त्या स्त्रीने अशोकला माघारी बोलावून होकार दिला.

कमला नावाच्या सुनेला विचारून (बोलावून घेतले.) तिने बहुधा होकार दिला असावा. अंगणात गाई-गुरे, शेळ्या भरपूर होत्या. नवीन वास्तूत फरशा वगैरे बसवायचे काम सुरू असावे कारण फरशांची चळत दिसली.

घराचा मालक इथे नसावा व धनगर केअरटेकर, जो बाजूला राहतो, त्याने व्यवस्था केली असावी असे वाटले. मागे बाथरूम व पाण्याची सोय होती म्हणून स्नान करता आले. मागच्या बाजूने वास्तूमध्ये फ्रीज दिसला.

भोजनानंतर मी कमलाला म्हटले की 'मालक कुठे राहतात?' 'मीच आहे मालक' असे तिने म्हटल्यावर मी गारच झालो.



इथे पोहोचण्यापूर्वी करझन नदीचे अडविलेले पाणी दिसले. आमची सर्व वाटचाल डोंगरामधूनच होती. राजपिपलापासून ६ कि.मी. अलीकडे तिघे जण स्कूटर उभी करून आमची वाट पाहत होते.

चपला काढून प्रत्येकाने नमस्कार केला. एकाने नमस्कारासह एक काठीदेखील दिली व म्हटले की 'ही तुमच्यासाठी!' आम्ही खिशातून पैसे काढले तेव्हा दोन रुपयांचे नाणे मागून घेतले.

'माझी आहे ती काठीं खालून तडकली असून रोज तडा वाढतोय. थोड्याच दिवसांत ही काठी उभी दुभंगेल ही चिंता मला असल्याने मी काठीला दोरा बांधायच्या विचारात होते.' आज ही काठी मला दिली गेली ती यामुळेच का? आणि इतर दोघांना नाही तर मलाच ती का दिली जावी? 'नर्मदे हर.'

पूर्ण बारा तास चालून आम्ही राजपिपला हे शहर गाठले. रात्री हरसिद्धी आश्रमात राहिलो. परिक्रमावासी म्हणून निःशुल्क भोजन (पैसे द्यायला तयार असतानाही) मिळाले, परंतु फॅनिंनच्या टेबलावर नव्हे तर ओट्यावर (पारावर) आणि आमच्या ताटात! मला त्यांचे हे वागणे धक्कादायक व अपमानास्पद वाटले. भिकारी वागणूक मिळाली.

**दिवस २१ वा : राजपिपला–उपछा (च्या अलीकडे ३ कि.मी.) एकूण २० कि.मी.**

रेल्वे लाइन व हायवे यांमधील भागात केळ्याची भरपूर लागवड. रस्त्याच्या कडेने मैलोन्‌मैल 'सबजा'ची झुडुपे होती.

देवळाची मुख्य दारे सकाळी ६ ला उघडल्यावर बाहेर पडलो. तत्पूर्वी ड्यूटी लावल्याप्रमाणे प्रांगणातील कोंबडे सादप्रतिसादात्मक कचकून आरवत होते. अशा आरवण्यामुळेच वैतागून माणसाने पहिला कोंबडा कापला असावा असे मजेशीर उगाच वाटून गेले.

मैय्याचा संग लाभण्यासाठी उलटसुलट जाण्याऐवजी हमरस्त्याने जावे हा पर्याय स्वीकारून निघालो. विरह आहे तो आणखी २/३ दिवसांचा!

अंधारातच वाटेला कुणी M 80 उभी करून काही पाहिजे का विचारले. आम्हांला काही कळले नाही कारण सरळ रस्ता होता. तो दूधवाला होता आणि 'दूध पिणार का?' असे विचारत होता. १ लिटर दूध प्यायलो, 'नर्मदे हर!' पैसे घेतले नाहीत.

१० ।। वाजता न्याहारी करून पुढे निघालो. घरे सोडून पुढे आलो होतो तो एक स्त्री मागून आवाज देत होती. मागे पाहून थांबतो तो तिने आम्ही कोण अशी चौकशी केली. परिक्रमावासी म्हटल्यावर चहासाठी आम्हांला मागे घरी घेऊन गेली. तिने पूर्वीच घरासमोरच हाक मारली होती आणि आमचे लक्ष नाही पाहून आमच्या मागे मागे बरेच अंतर आली होती. न्याहारी नंतर चहा घेतला नव्हता. त्याऐवजी नंतर रस पिऊ असे मंगल म्हणाली होती. परंतु तिची आंतरिक इच्छा (कदाचित) जाणून मैय्याने चहा दिला.

या चहाच्या अगोदर एका ठिकाणी ठेल्यावर चहा घेतला त्याचेही पैसे घेतले नव्हते.

आजही १२ ।। वाजता भोजन मिळेल ही अशोकची भविष्यवाणी १२.५० झाले तरी खरी ठरायची लक्षणे दिसेनात. साखर कारखान्यामुळे उसाच्या (बैल) गाड्यांची रीघ होती. जवळ मांसमटण भोजनटपऱ्या होत्या. आतापर्यंत छान सावली होती, पण अचानक या भागात सावली दिसेना आणि मी असह्य उन्हाने बाभळीच्या तुटपुंज्या सावलीत रस्त्याच्या कडेलाच बसकण मारली. भोजन जाऊ दे, पण ऊन आवर असे मैय्याला सांगायची पाळी आली होती.

उठलो आणि निघालो तोच अशोकने चौकशीअंती बातमी दिली की साखर कारखान्याच्या कॅन्टिनमध्ये भोजन मिळते. 'नर्मदा' कारखान्याच्या कॅन्टिनमध्ये मी थाली घेतली. तिखटपणामुळे अशोक व मंगलने चहाबरोबर पोळ्या खाल्या. नशिबाने नंतर एक पिशवी ताकही मिळाले. बिल? ''नर्मदे हर.''

---

जर एखाद्याने मनात असा विचार आणला की, नाही, मला माझा स्वभाव बदलता येणार नाही; तर ते चूक आहे.

दहा मिनिटे विश्रांती घेऊ म्हटले तर कळले की आवारात नर्मदामैय्याचे मंदिर आहे.



अतिशय प्रसन्न, गोंडस, मोहक रूपवती, आश्वासक आणि सर्व गुणसंपन्न वाटणारी/असणारी अशी मैय्याची मूर्ती पाहिली आणि डोळ्यांत अश्रू उभे राहिले. स्वतःच्या जणू माहेरी जशी लेकीची काळजी घेतली जाते तसे आमचे लाड मैय्याने स्वतःच्या घरी बोलावून केले.

संध्याकळचे ४.००-५.०० वाजले. गाव ३ कि.मी. लांब. एक कंपनी कॉलनी दिसली. तिथे मंदिर आहे असे कळले म्हणून तिथे जाताना रेल्वे लाइन (जी राजपिपलापासून आम्हांला समांतर साथ करीत आहे) पलीकडे रेल्वे केबिनप्रमाणे पांढरी वास्तू दिसली. तिथे विचारावे हा विचार चमकून गेला. एक व्यक्तीही ओझरती लांबून दिसली आणि नजरेआड झाली.

कंपनीच्या रक्षकाने सरळ नकार दिला. समोर हातपंप आहे. दोन बाकडी आहेत. रात्री दुकानदार घरी जातात तिकडे झोपा असे त्याने सांगितले. (आम्हांला फक्त पाणी व झोपायला जागा इतकेच लागते असे आम्ही त्याला सांगितले होते ना!)

आता ३ कि.मी. पुढे जाण्यावाचून गत्यंतर नाही हे कळून आम्ही वळलो तेवढ्यात एक मोटरसायकल तिथे येऊन थांबली. चौकशीअंती त्याला आमची कहाणी समजली.

''समोर माझी कुआँ रूम आहे. तिथे पाणी ६ वाजेपर्यंत आहे व खोली सामानाने भरलेली आहे. तिथे दाटीवाटीने झोपता येईल का ते पाहा किंवा ३ कि.मी. चालणार असाल तर काहीच प्रश्न नाही कारण मी स्वतःच तिथे राहतो. सर्व व्यवस्था होईल.''

कुआँ रूम म्हणजे आम्ही समजलो होतो ती रेल्वे केबिन नव्हती तर पंपरूम, खाजगी होती.

आलो, पाहिले तर एक रूम पूर्ण सामानाने भरलेली तर एकात पंप, ट्यूबवेल आणि रेती इत्यादी सामान. अंगणात झोपायचा निर्णय घेतला व स्नानासाठी गेलो. दरम्यान मालक किशोर पाण्डे, जे रंगावधूत स्वामींचे भक्त आहेत, त्यांनी घरी जाऊन आमच्यासाठी चहा आणला. जेवायच्या वेळा १५/२० पोळ्या, डबाभर उसळ, फ्रूट सॅलड, मोठी बॅटरी, सकाळच्या आंघोळीसाठी पातेले, मोठे रग, ब्लँकेट हे सारे बाइकवरून घेऊन आले.

त्यांचे उसाचे शेत आहे आणि नोकरी संपल्यानंतर हा उपक्रम आहे.

मी मैय्याच्या या अदभुत कृपेचे वर्णन लिहिताना ते कंदिलाच्या प्रकाशात, अंगणात माझ्या स्लीपिंग बॅगवर बसून. बाजूला अशोक आणि मंगल निद्राधीन झाले.

मोठे लाकूड आणून शेजारी शेकोटी पेटवली आहे. बाजूला उसाचे शेत, पलीकडे रेल्वे सिंगल लाइन आणि त्यापलीकडे वर्दळीचा अंकलेश्वर हमरस्ता, वर ताऱ्यांनी भरलेले आकाश! नर्मदे हर!

क्रमशः

**श्री. अरविंद ओक**
मानपाडा, डोंबिवली.
भ्रमणध्वनी : ०९८३३४४१५८०

●●●

ज्यानं चांगलं केलं असेल त्याच्या जीवनात भविष्यकाळात चांगलं घडणं हे नियतीचं अभिवचन आहे.

# श्रीमत् भगवद्गीता - अध्याय सतरावा
# दैवी आणि आसुरी संपन्न विचार

*कै. शंकरराव मठांनी दिशासाठी दिलेल्या लेखमालेतील १७ व्या अध्यायावरील हा लेख. या लेखाच्या माध्यमातून कै. मठांना आम्ही विनम्र अभिवादन करतो. – संपादक*

**श्लोक १ ते ६ श्रद्धा व शास्त्र विरुद्ध तपाचरण करणारे लोक, त्यांची गती**

अर्जुनाने विचारले – कृष्णा, जे लोक शास्त्रविधी सोडून, पण श्रद्धेने युक्त होऊन यजन करतात त्यांची निष्ठा कशी असते? सात्त्विक, राजस की तामस?

श्रीकृष्ण सांगतो, प्रति प्राणिमात्रांची स्वभावतः जी श्रद्धा असते ती सात्त्विक, राजस, तामस अशी तीन प्रकारची असते. त्याचे वर्णन ऐक. हे भारता, सर्व लोकांची श्रद्धा आपआपल्या सत्त्वानुरूप अर्थात प्रकृतिस्वभावानुसार असते. मनुष्य हा श्रद्धामय आहे. जशी ज्याची श्रद्धा असते, तसाच तो असतो. सात्त्विक पुरुष देवाचे यजन करतात, राजस लोक यक्षराक्षसांचे यजन करतात. यांशिवाय जे तामस पुरुष आहेत ते लोक प्रेत आणि भूतगणांचे यजन करतात.

जे लोक दंभ आणि अहंकार यांनी युक्त होऊन, कामोपभोगाच्या आसक्तीने घायाळ होऊन शास्त्रविरुद्ध महाघोर तप करतात आणि जे अविवेकी पुरुष शरीरस्थ पंचमहाभूतांच्या समुदायाला व शरीरांतर्गत असलेल्या आत्म्याला कष्ट देतात त्यांना आसुरी निश्चयाचे समज.

**श्लोक ७ ते २२ आहार, यज्ञ, तप, दान यांच्यातील विविध भाव**

सर्वांना आवडणारे भोजन तीन प्रकारचे असते आणि यज्ञ, तप, दानही याचप्रमाणे तीन प्रकारचे असते. त्यांचा भेद सांगतो तो ऐक. आयुष्यसत्त्व वाढविणारे बळ, आरोग्य, सुखप्रीती वाढविणारे रसयुक्त, स्निग्ध, शरीरात स्थिर रूपाने फार वेळ राहणारे आणि मनाला आनंद देणारे आहार सात्त्विक मनुष्याला प्रिय असतात. खमंग, आंबट, खारट, दाहक तसेच दुःख, शोक आणि रोग वाढविणारे आहार राजस मनुष्याला प्रिय असतात. शिळे, नीरस, दुर्गंधियुक्त, उष्टे व अपवित्र भोजन असते ते तामस लोकांना अत्यंत प्रिय असते.

फळाची आशा सोडून कर्तव्यबुद्धीने मन शांत ठेवून शास्त्रविधिप्रमाणे जो यज्ञ केला जातो त्याला सात्त्विक यज्ञ म्हणतात. हे भरतश्रेष्ठा, मनात फळाशा धरून दांभिकपणाने जो यज्ञ केला जातो तो राजस यज्ञ आहे असे समज. शास्त्रविधीच्या विरुद्ध अन्नदान न करता मंत्र व दक्षिणारहित अंधश्रद्धेने जो यज्ञ केला जातो त्याला तामस यज्ञ म्हणतात.

देवता, द्विज, गुरू आणि ज्ञानी यांची पूजा, शुद्धता सरळपणा, ब्रह्मचर्य आणि अहिंसा याला कायिक तप म्हणतात. मनाचा उद्वेग न करणारे सत्य, प्रिय व हितकारक भाषा, स्वाध्यायाचा अभ्यास करणे याला वाचिक तप म्हणतात. मनाची प्रसन्नता राखणे, सौम्यता धारण करणे, मौन धारण करणे, आत्मनिग्रह आणि आत्मशुद्धी करणे या सर्वांना मानसिक तप म्हणतात. फलाभोगाची आसक्ती न धरणाऱ्या योगावलंबी साधकाकडून उत्तम श्रद्धेने जे या तीन प्रकारांचे तप केले जाते तयाला सात्त्विक तप म्हणतात. जे आपला सत्कार, मान, पूजा यांसाठी अथवा दंभाने तप करतात त्या अस्थिर आणि चंचल तपाला राजस तप म्हणतात. मूर्खपणाने, दुराग्रहाने स्वतः कष्ट करून व दुसऱ्याला उखडण्यासाठी जे तप केले जाते त्याला तामस तप म्हणतात.

दान देणे हे आपले कर्तव्य आहे असे समजून जे दान योग्य देशी,काली आणि योग्य पात्री प्रतिउपकार न करणाऱ्याला दिले जाते ते सात्त्विक दान होय. प्रत्युपकाराच्या आशेने, फलभोगाच्या इच्छेने व मोठ्या कष्टाने जे दिले जाते त्याला राजस दान म्हणतात. जे दान निंदा करून, अपमान करून, अयोग्य देशी, अयोग्य काळी आणि अयोग्य पात्री दिले जाते ते तामस दान होय.

**श्लोक २३ ते २६ ॐ तत् सत्‌ची व्याख्या**

ॐ तत् सत् असा ब्रह्माचा तीन प्रकारे निर्देश केला जातो. याच्यामुळेच पूर्वकाळी ब्राह्मण, वेद आणि यज्ञ निर्माण झाले. म्हणूनच ब्रह्मवादी लोकांचे यज्ञ, दान, तप आणि कर्म हे ओम्काराचा उच्चार करून सतत केले जाते. मोक्षप्राप्तीची इच्छा धरणारे लोक यज्ञ, दान, तप आणि कर्म तत् शब्दाचा उच्चार करून, फलाची भोगतृष्णा सोडून विविध यज्ञ, तप आणि क्रिया करतात. ज्ञानी लोक सत् या शब्दाचा प्रयोग सभाव व साधुभाव या अर्थी करतात. याच प्रकारे हे पार्था, प्रशस्त कर्मासाठीही सत् शब्दाचा प्रयोग केला जातो. यज्ञ, तप आणि दान यांत जी स्थिर भावना ठेवावी लागते त्यालाही सत् म्हणतात आणि त्यांच्याप्रीत्यर्थ जे कर्म होते त्यालाही सत् असेच म्हणतात.

हे पार्था, अंधश्रद्धेने जे हवन केले असेल, दान दिले असेल, तप केले असेल अथवा दुसरे काही कर्म केले असेल त्याचा निर्देश असत् शब्दाने केला जातो. ते इहलोकी आणि मृत्यूनंतरही चांगले फळ देत नाही.

अर्जुनाचा प्रश्न बराच बोलका आहे. कित्येकांना शास्त्रविधी समजत नाही. मात्र जे कर्म करतात ते अत्यंत श्रद्धेने करतात. असे श्रद्धाळू लोक जे यज्ञ-दान-तप करतात त्याला सात्त्विक, राजस अथवा तामस या कोणत्या विभागात घालावे?

यावर श्रीकृष्ण सांगतात, प्रत्येक मनुष्यात जी श्रद्धा असते ती सात्त्विक, राजस, तामस अशी तीन प्रकारची असते. मनाचा दृढ विश्वास म्हणजे श्रद्धा. तसेच मनाच्या स्वाभाविक प्रवृत्तीलाही श्रद्धा म्हणतात. कितीही प्रयत्न केला तरी जी मनःप्रवृत्ती बदलत नाही तिचे नाव श्रद्धा. शरीर, इंद्रिये, मन इत्यादिकांची जशी सत्त्वशुद्धी होते तशी ही प्रवृत्ती शुद्ध अथवा अशुद्ध होऊन तदनुसार सात्त्विक, राजस, तामस व्यवहार प्रकट होतो. ही सत्त्वशुद्धीवर अवलंबून असल्याने आपल्या शुद्धाशुद्धतेनुसार ही श्रद्धा भिन्न असते.

सामान्यतः सात्त्विक लोक देवतांचे भजनपूजन करतात. राजस लोक यक्षराक्षसांचे अनुयायी होऊन मोठी शक्ती संपादन करतात व त्याद्वारे पुष्कळ भोग वाढविण्याचा प्रयत्न करतात. तामसी पुरुष भूत, प्रेत, पिशाच, स्मशान इत्यादिकांची पूजा करतात. कोण कशाची उपासना करतो हे पाहून तो मनुष्य कोणत्या प्रवृत्तीचा आहे याचे ज्ञान होते.

आपल्या ठिकाणी जो परमात्म्याचा अंश आहे त्याला अशास्त्रीय घोर तपस्येमुळे फार कष्ट होतात. म्हणून अशी माणसे नेहमी अप्रसन्न, खिन्न, संतप्त व आक्रोश करीत जीवन कंठतात. आपल्या मानसिक प्रवृत्तीला अनुरूप व आपल्यास योग्य असे जे सात्त्विक उपासनेचे साधन असेल तेच त्यांनी करावे. म्हणजे थोडीतरी सत्त्ववृत्ती दृढमूल होईल व हलके हलके वाढत जाईल. केव्हा ना केव्हा उत्तम सत्त्व गुणात ह्या वृत्तीचा विकास होईल.

हा त्रिविध भाव भोजन, तप, यज्ञ, दान या गोष्टींवरूनही ध्यानात येण्यास मदत होते. त्रिविध भोजनः सात्त्विक - कित्येकांना स्निग्धमधुर भोजन आवडते. राजस - काहींना रूक्ष, दाहक भोजनाची आवड असते. तामस - कित्येकांना शिळे, सडलेले, उष्टे, अपवित्र भोजन आवडते. दारिद्र्यामुळे तामस आहार खावा लागतो हे समजू शकते, पण ज्यास हे विपुल प्रमाणात प्राप्त आहे तो जर प्रवृत्तीनुरूप शिळे, खमंग, आंबलेले, सडके, कुजके आवडीने खाऊ लागला तर त्याला तामसीच म्हणावे. थोडक्यात प्रकृतीनुरूप अन्नाची आवड असते. प्रत्येकाला कोणता आहार स्वभावतःच प्रिय असतो यावरून त्या मनुष्याची परीक्षा होते. ही परीक्षा स्वाभाविक अशीच आहे.

आपण धर्मराजाच्या वृत्तीचे आहोत की दुर्योधनाच्या याचा विचार प्रत्येकाने आपापल्या मनात करावा.

यज्ञ, दान, तप यांच्याद्वारे अशी परीक्षा करता येते; परंतु मनात एक असता केवळ देखाव्यासाठी एखादा मनुष्य आपल्या ठिकाणी नसलेल्या प्रवृत्तीचे प्रदर्शन करू लागेल. त्यामुळे यज्ञ, दान, तप हे एखाद्या वेळी मनाविरुद्ध केले जाऊ शकते; परंतु भोजनाचे तसे नाही. स्वभावाविरुद्ध भोजन करावे लागल्यास भोजनोत्तर वमन होऊ शकते. कारण त्याचे शरीरच ते अन्न बाहेर टाकते. म्हणून मनुष्याची सत्त्व इत्यादी परीक्षा अन्नावरून होते.

**सात्त्विक यज्ञ** – फलभोगाची इच्छा न धरता शास्त्रानुरूप विधी हा केलाच पाहिजे असे मानून समाधान वृत्तीने जो यज्ञ केला जातो त्याला सात्त्विक यज्ञ म्हणतात.

**राजस यज्ञ** – यज्ञ फक्त माझ्या उपभोगासाठी झाले पाहिजेत. ऐश्वर्याचा थाट, अशांत मन, असा हा यज्ञ राजस होय.

**तामस यज्ञ** – अविधिपूर्वक कोणत्याही प्रकारच्या दानाशिवाय केलेला यज्ञ हा तामसी होय. याने हानी घडते. तपाचे शरीर, वाक्, मन असे आणखी प्रकार आहेत. शरीराने केले जाते ते शारीरिक तप, वाणीने होणारे तप वाचिक आणि मनाने होणारे तप मानसिक . ब्रह्मचर्य हे शारीरिक तप तसेच पवित्रता, अहिंसा हेही शारीरिकच होत. वाचिक – कटू न बोलणे, प्रिय हितकारक बोलणे, वाणीचा संयम, स्वाध्याय. मानसिक – मन प्रसन्न ठेवणे, कोणत्याही विकारापासून मनाला दूर ठेवणे, मौनधारणा. सात्त्विक तप– परमश्रद्धेने, फलाशारहित, मानसन्मानाची अपेक्षा न ठेवता केलेले तप. राजस तप–मान वाढावा, घमेंड, देखावा यांसाठी होणारे तप. तामस तप–दुसऱ्यांना उखडून टाकण्यासाठी केले जाणारे तप. दानसुद्धा त्रिविध – देश–काल–पात्र यांचा विचार करून कर्तव्य बुद्धीने दिलेले दान सात्त्विक असते. आपले नाव व्हावे, प्रत्युपकार व्हावा आदी इच्छेने केलेले दान राजस होय. देश–काल–परिस्थितीविरुद्ध निंदा व अपमान करून कुपात्री दिले जाणारे दान तामस होय. सात्त्विक दानाने सर्वांचे कल्याण होते. राजस दानाने वाटपाचा अहंकार वाढतो. तामस दानाने घेणारा व देणारा या उभयतांची हानी होते.

ब्रह्माचा निर्देश ॐ तत् सत् याने करतात. तत् म्हणजे ने ते त त्वम् सत् होय म्हणजे त्रिकालाबाधित. तीनही काळी एकसारखेच राहणारे. तीच एक सत्य वस्तुअसून तिचेच नाव ॐ आहे. ॐकार हा सत् वस्तूचा वाचक आहे. यात तीन मात्रा आहेत. अ+उ+म्. अ–अवति, रक्षति, अतति, सातत्येन तिष्ठति, हा जागृतीत होणारा अनुभव. उ–उत्कर्ष, उत्तम स्थिती–साम्यावस्था स्वप्नात होणारा अनुभव. म–परिणाम, लय, अंतिम अवस्था, सुषुप्तीत येणारा अनुभव, अर्धमान–अद्वैत, अनिर्वचनीय, आत्म्याची शुद्ध अवस्था भूतं भविष्यत् भवत् इति सर्वं ॐकारं – भूत वर्तमान भविष्य हे सारे काही ॐकारच आहे. ॐ तत् सत् हा परमात्म्याचा निर्देश आहे, संकेत आहे. या निर्देशाने ब्राह्मण, वेद आणि यज्ञ यांचे विधान होत आले आहे. ब्रह्मजानाति स ब्राह्मणः ब्रह्माचे वर्णन वेदात आहे. ॐ इति एकासरं ब्रह्म। ब्रह्मार्पण हाच यज्ञ. म्हणूनच यज्ञ दान तप आदी क्रिया ब्रह्मवादी लोक ॐकाराच्या उच्चाराने करतात. तत् म्हणजे परब्रह्म, सत् म्हणजे अस्तित्त्व असणे, शुभ प्रशस्त कर्म हे आहेत. ॐ तत् सत् याचा अर्थ ध्यानात घेतल्यास सर्व शुभ गोष्टींचा समावेश होतो. अशा समर्पणाने शाश्वत ब्राह्मी स्थिती प्राप्त होते हा भाव, ही शुभेच्छा साधकाने आपल्या मनात धरावी व शुभ कर्मे करून स्वतःला कृतकृत्य करावे.

जे श्रद्धेने केले जाते ते सत्, अंधद्धेने केले जाते ते असत्. असत् कर्माने इहलोकी वा परलोकीही फलप्राप्ती नाही. म्हणून जे करावयाचे ते श्रद्धेने करावे, सद्भावनेने करावे. थोडक्यात श्रद्धा, भक्ती आणि शास्त्र याला अनुरूप कर्म करावे. अंधद्धेने केल्यास फक्त कष्ट होतील, ते कर्म व्यर्थ मानले जाईल. श्रद्धेने कर्म करून कृतकृत्य व्हावे.

**कै. शं. बा. मठ**

●●●

# भावपूर्ण श्रद्धांजली



विद्या प्रसारक मंडळाच्या बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाचे सेवानिवृत्त ग्रंथपाल प्रा. मोहन पाठक यांचे सोमवार दिनांक १९.०५.२०१४ रोजी पहाटे ५.०० वाजता वयाच्या ६३ व्या वर्षी निधन झाले.

प्रा. मोहन पाठक हे विद्या प्रसारक मंडळाच्या 'दिशा' मासिकाचे कार्यकारी संपादक म्हणून काम पहात होते. ठाण्यातील अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थांशी जवळचे संबंध असलेले श्री. मोहन पाठक उत्कृष्ट लेखक, संपादक व विद्यार्थिप्रिय शिक्षक म्हणून कायम स्मरणात राहतील. ठाणे येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'ठाणे वैभव' व 'सन्मित्र' या दैनिकांमध्येही प्रा. पाठक यांनी विपुल लेखन केले.

विद्या प्रसारक मंडळाच्या सेवेत 'ग्रंथपाल' म्हणून काम करत असताना प्रा. पाठक यांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ ग्रंथालय आणि माहितीशास्त्र व पत्रकारिता प्रमाणपत्र या अभ्यासक्रमांचे संयोजक म्हणून काम केले होते. 'ठाणे मराठी ग्रंथालय' यांच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या ग्रंथालय प्रमाणपत्र वर्गाचे अनेक वर्षे ते 'मुख्याध्यापक' होते.

विद्यार्थिप्रिय असणाऱ्या प्रा. मोहन पाठक यांच्या निधनामुळे ग्रंथालय आणि माहिती क्षेत्रामध्ये हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. 'विद्या प्रसारक मंडळ' त्यांच्या परिवाराच्या दुःखात सहभागी आहे.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.

# भारतीय संस्कृती-बीज, मॉडेल व साधना

*श्री. साने यांच्या विचारपरिपूर्ण लेखमालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

## प्रस्ताविक

सामाजिक व राजकीय वादात आजकाल नकळत तीव्र उथळपणा दिसतो आहे. त्यात अध्यात्मशास्त्रीय ज्ञानाचा अभाव दिसतो का?

अध्यात्म व स्पिरिच्युएलिटी हे शब्द भारतीय संस्कृती व पाश्चात्त्य संस्कृतीतील वेगळ्या संकल्पनेचे निर्देशक आहेत. त्यामध्ये खूप फरक आहे. प्रथम आपण त्यातील 'गृहीते' कोणती ती पाहू या. ती तपासल्यावर भूमिका स्पष्ट होतील.

'अध्यात्म' हा संस्कृत भाषेतील शब्द भारतीय 'देवभाषा' ह्या मूळ संकल्पनेतील आहे. त्याचा 'आत्मा' 'शरीर' ह्यांच्या 'वैश्विक जगातील' ('सत्य' (चिरंतन)"Truth"- or "Cosmic objective Reality") या अंतिम उच्च पातळीवरील 'अर्थाशी' संदर्भ आहे.

## पूर्वग्रह वा गृहीते कोणती?

तत्त्वज्ञानातील अनेक ग्रंथ, संहिता, शास्त्रसाधना, दर्शने वगैरे अनेक विषयांमधील संकल्पनांचा 'सत्य बोध' या 'अनुभूती' प्राप्त होत असताना, ह्या मूळ अर्थाशी संदर्भ व जागृती ठेवूनच 'प्रगती' किंवा 'वाद' वा 'चर्चा' कारावयास हवी. हे मूलभूत मतैक्य 'व्यष्टि, समष्टि, सृष्टी व अंतिम परमेष्टि' ह्या विश्वातील घटकांमध्ये गृहीत धरावयाला हवे! म्हणजे हे नाते सत्य आहेच, पण त्याची स्मृती जागृत करावयाला हवी. हे अत्यंत आवश्यक आहे. शिवाय ह्या ज्ञानाची जाणीव समाजात पूर्वीच उपलब्ध होती हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

## भिन्न धर्म, देश, संस्कृती व भिन्न गृहीते

ह्या संकल्पनेत 'शरीर' हे मर्त्य व आत्मा हा 'अमर' हेसुद्धा 'गृहीत ज्ञान' समजून चालले पाहिजे.

पण 'स्पिरिच्युॲलिटी किंवा स्पिरिच्युॲलिझम 'Spirituality or Spiritualism' ह्या इंग्रजी भाषेतील संकल्पना ह्या तुलनेने पाश्चात्त्य संस्कृतीमधील अर्थाशी निगडित आहेत व त्या हाताळताना काळजी घ्यावयाला हवी. ती कोणती हे प्रसंगानुरूप विशद करू या.

आजचा लेखाचा विषय आहे की भौतिक जगातील व्यवहारात जे वाद घातले जातात त्याचा अध्यात्मशास्त्राशी व साधनाशी का व कसा संबंध असतो व तो जाणल्याने कोणत्या प्रकाराने अध्यात्मशास्त्रातील सत्य ज्ञानाचे दर्शन घडते? ते झाल्यावर त्या वादाचे जे निरनिराळे दर्शन केवळ बुद्धी व इंद्रियांवर (सीमित दर्शन) आधारलेले होते, त्यांतील 'अज्ञानाचा' सुद्धा स्वच्छ प्रकाश पडतो वा पडू शकतो; पण त्यासाठी प्रयत्न करावे लागतात. हे प्रयत्न भौतिक पातळीवर नसून अंतरंग, आगमशास्त्र, योग वगैरे पातळ्यांवर आधारलेले असतात.

आपण सध्या काही प्रचलित वादांची उदाहरणे पाहू या.

**स्कल कॅप**



आजूबाजूची माणसं जशी आहेत तशी स्वीकारायला पालकांनीच मुलांना शिकवायला हवं.

**'Scull Cap'** म्हणजे मुस्लीम समाजात प्रार्थना करताना आदराने डोक्यावर घालण्याची टोपी हे वादग्रस्त उदाहरण खळबळ माजवून राहिले आहे!!

**टोपीचे राजकीय अर्थ?**

भा.ज.प.चे पंतप्रधानपदाचे उमेदवार नरेन्द्र मोदी (न.मो) ह्यांनी ही टोपी घालण्याचे नाकारले. पण त्यांनी त्याउलट इतर अनेक संप्रदायांची 'Head Gears' डोक्यावर आदराने घालून घेतली!! त्या वेळी कुठलीही टाळाटाळ केली नाही असे का? त्याच्या उत्तरादाखल त्यांनी सांगितले की व्यक्तिशः त्यांचा कुठलीही टोपी घालणे किंवा न घालणे याबद्दल काही विशेष प्रत्यवाय नसतो, पण सध्याच्या भारतीय राजकारणात मुस्लीम समाजाची मते मिळवण्यासाठी ही टोपी घालणे, म्हणजे मुद्दामहून एक 'Appeasement' कृती म्हणजे 'हांजीऽ हांजीऽ' सारखी 'लाचार मनधारणी' केल्याची भावना गृहीत धरली असा अर्थ प्राप्त होऊ शकेल, त्याला त्यांचा विरोध आहे.

ह्याउलट मा. राजनाथसिंग म्हणजे भाजपचे अध्यक्ष यांनी अशी कुठल्याही प्रकारची वेगळी भावना न ठेवता, त्या वेगवेगळ्या संप्रदाय व धर्माच्या चालीरितींचे भान ठेवून सर्वधर्मसमभाव या भावनेने टोपी घालणे हे त्यांच्या स्वभावात आहे, असे सांगितले.

पण भाजपच्या प्रतिस्पर्धी राजकीय पक्षांचे म्हणजे काँग्रेस, समाजवादी, जनता (दल) वगैरे पुढाऱ्यांनी मात्र नरेन्द्र मोदी यांच्या या भेदभाव सांप्रदायिकतेतील 'Communalism' म्हणजे 'जातीयवादालाच' ते हेतुपुरस्कर खतपाणी घालतात असा आरोप केला. जातिवैमनस्य ह्या प्रकाराला हे जे वादाचे, संघर्षाचे व कटूतेचे रंग आले ते मानवजातीचे कुठले अज्ञान आहे, ते नेमके दर्शवते!

**टोपी प्रतीक ह्याचे राजकीय, ऐतिहासिक, सांप्रदायिक अर्थ त्यांतील गूढार्थ आध्यात्मिक अर्थ ठरवतात.**

आतापर्यंत 'टोपी' ही इथे 'प्रतीकात्मक' आहे. या आधुनिक सांस्कृतिक बुद्धिदर्शनाचे शहाणपण सगळ्यांनाच प्राप्त असतानाही, ह्या प्रतीकांच्या भावनांना मिठ्या मारून बसण्याची नाटके का बरे चालतात? कोणत्या विरोधी भावना जागृत होतात व का?

**उथळ भौतिक संस्कार**

ह्याचे कारण एकच आहे की ह्या प्रतीकांच्या माध्यमांबद्दल ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक रंगाबद्दल संस्कारांची जाणीव असतानादेखील त्यांना चिकटून बसून किंवा त्यांत खरोखरच अडकून बसून केवळ राजकारणाच्या 'राजकीय सत्ता' उद्दिष्टांसाठी एक तऱ्हेच्या बुवाबाजीने हा वाद माजवणे ही भावना दोन्ही बाजूला प्राबल्याने दिसते आहे! प्रतीकांतून माध्यमामुळे त्यांचे **मान, अपमान का व्यक्त होतात?**

**खरा संस्कार अध्यात्मिक आहे.**

हे मान्य होण्यास काहीच अडचण नसावी, पण 'टोपी' हे 'प्रतीक' आहे का केवळ माध्यम आहे? ह्याचा खरा अर्थ कोणता आहे? हा अर्थ त्या वस्तूला चिकटून बसला आहे त्याचा ऐतिहासिक संदर्भ, सांस्कृतिक संदर्भ किंवा 'धार्मिक अथवा आध्यात्मिक' संबंध कोणता? हे जाणण्याचा प्रयत्न न करणे हा खरा सामाजिक दोष आहे!!


**प्रतीकांचा जन्म व वापर**

**ही आहे मुळातच ज्यू लोकांची 'यार मुल्के' (Yar-Mul-Ke also yar-mel-ke) "A Skullcap worn by jewish men and boys, especially those adhering to orthodox or conservative Judaism."**

ह्यातील ऐतिहासिक भाग फारच मजेचा आहे. त्याची माहिती पुढीलप्रमाणे आहे.

---

उत्तम घर म्हणजे वादळातला सहारा, मनाचं अभयारण्य, दुःखातलं सांत्वन आणि आनंदाचं वसतिस्थान असते.




**चार कवट्या व एक टोपी – जर्मन प्रतीक**

**धर्म, संस्कार व त्यांची भौतिक वाटचाल**

याचा खरा अर्थ, ह्या ज्यू धर्माच्या विचारांवर आधारलेल्या 'समाजमनावर' झालेल्या 'संस्काराचा' आहे. 'संस्कृती' ही अनेक संस्कारांवर आधारून संपन्न होते व त्यात मानवी कॉन्शसनेसच्या बऱ्यावाईट संस्कारांनी त्याची पुढील वाटचाल चालू राहते.

**स्कल टोपीचा संस्कार इस्लामिक कधी झाला?**

पण त्यामुळे हा 'स्कल टोपी'चा संस्कार इस्लाम धर्माच्या स्थापनेनंतर मुस्लीम समाजमनावर कसा झाला हे बघणे आवश्यक ठरेल. त्यानंतरही जर्मन, रशियन सांस्कृतिक इतिहासात ह्या 'विशिष्ट' संस्काराची पावले उमटलेली दिसतात; **परंतु ह्या अभ्यासात आपण आज न पडता ह्या पृष्ठभागावरील संस्काराची मुळे कुठे आहेत हे पाहणे जास्त महत्वाचे ठरेल.**

**संस्काराचे भौतिक व आध्यात्मिक विज्ञान**

ह्या लेखाचा खरा उद्देश हा या **'संस्कारक्रियांच्या विज्ञानावर'** प्रकाश टाकणे हा आहे. थोडक्यात सांगावयाचे झाल्यास हा 'संस्कार' एका पिढीमधील समाजमनावर किंवा ('Religion') धर्मावर झालेला दिसतो. तो एका अत्यंत 'गूढ' योगिक आंतरिक क्रियांनी न कळत 'जीवात्म्यावर', 'चित्त' ह्या 'अदृश्य' इंद्रियातील 'अंतःकरण भागावर' होऊन पुढील प्रवासात जन्म, मृत्यू, पुनर्जन्म ह्या संसारचक्रावरील मार्गाने पुनःपुनः नवनवीन पिढीमधील जीवात्म्यांच्या त्यांच्या पृथ्वीवरील व सत्य लोकातील वास्तव्यात प्रकट होऊन पुढील 'दृढ संस्कारा' कडे प्रगत होत जातो!!

त्या योगक्रियांचे वर्णन व मार्ग 'पातंजल योग दर्शनात' साधनक्रियांच्या मार्फत होणाऱ्या संस्कारक्रियांच्या स्वरूपात कथन केले आहे.

**आध्यात्मिक संस्कारविज्ञान**

ह्या साधनांचे विज्ञान आजही ह्या संहिता व शास्त्रांद्वारे उपलब्ध आहे. दुर्दैवाने 'भारतीय' संस्कृतीत ते विस्मरणाच्या, अंधविश्वासाच्या व भौतिक दर्शनाच्या खोल दरीमध्ये एका गर्तेत सापडले आहे.

याचे पुनरुज्जीवन होऊ शकते व 'मानवी आध्यात्मिक ज्ञानाच्या' संदर्भात पुनःसंशोधित व प्रत्यक्ष साधनेत हे होणे अत्यंत आवश्यक आहे.

हे जर झाले, तर ह्या एकाच नव्हे तर अनेक 'संस्कारांच्या' मूळ स्थान व विज्ञानाकडे मानवजातीचे ज्ञान पोचून, त्यावरचे उथळ वाद, संघर्ष आणि जीवनाचा व ह्या पृथ्वीवरील मानवी जीवनाच्या संधीचा अपव्यय होण्याचे टळेल!!

**राष्ट्रध्वज संस्कार**

अशाच एका दुसऱ्या संस्काराचे उदाहरण तपासणे हे ह्या ज्ञानाच्या सत्यतेबद्दलचे संशय मिटवू शकेल. हा संस्कार 'राष्ट्रभक्ती व ध्वज' ह्या जातीचा आहे!!










आपला 'राष्ट्रीय ध्वज' (Indian National Flag) हा १९०४, १९०६, १९४७, १९५० ह्या अनेक रूपात्मक बदलांतून संक्रमित झाला आहे. त्याची विस्तृत ऐतिहासिक चर्चा आहे. ती तितकी महत्त्वाची नाही. ही रूपांतरे इंटरनेटवर खालील वेबसाइटवर उपलब्ध आहेत.

"http://www.maps of india.com/maps/india/nationalflag.htm"

**History of Indian National Flag**

ही पाहिल्यावर मुद्दा उपस्थित होतो की केवळ कापडावर रंग, आकार, चक्र, चरखा, 'वंदे मातरम्' ही शब्दरचना लिहिलेली **'एखादी प्रतीकात्मक वस्तू' ही व्यवहार व राजकारण ह्या भौतिक दर्शनात त्याला राजकीय व पोलीस संरक्षणात का बंदिस्त करते?**

**"Indian National Flag Code"**

ह्याचा साधा सरळ अर्थ हा की 'प्रतीके' व 'संस्कार' ह्या संकल्पना यांचा मूळ उगम व नंतर त्यांचा स्वीकार समाजमनातून होणे व त्यानंतर त्याच्या आचरणासाठी जे 'संस्कार' पिढ्यानिपिढ्या ह्या पृथ्वीवरच्या जिवांना प्राप्त व्हावे, ह्याची 'व्यवस्था' ही पूर्णत्वाला पोचली व जाणली जात नाही. त्याचे कारण हेच आहे की हा 'संस्कार' वस्तुतः आत्मसंस्कार ह्या जातीचाच असतो आणि तो 'भौतिक व आध्यात्मिक' ह्या दोन्ही पातळ्यांवर व्हावयाला लागतो; पण तसा तो होत नाही. वरवर आणि उथळ स्तरावरच राहतो व त्याला पोलीस कायदा वगैरे संरक्षण द्यावे लागते.'

त्यामुळे, ज्या समाजव्यवस्था केवळ भौतिक शक्ती जाणतात व वापरतात त्यांतली समाजव्यवस्था ही अनंत काळपर्यंत चालणाऱ्या वैश्विक संस्कारक्रिया जाणत नाही. त्यामुळे भौतिक एकांगी अशी ॲडमिनिस्ट्रेशन, ज्युडिशिअरी, शासकीय यंत्रणा, शैक्षणिक वगैरे संस्था हा संकल्पित ईश्वरी कार्यक्रम यशस्वी पद्धतीने आचरू शकत नाही.

"Government" ''अंमलबजावणी'' ही वैश्विक शक्तींच्या पूर्ण विश्वासावर व जागृतिपर करणे हेच खरे उत्तर आहे. तेव्हा ही प्रतीके तेवढी महत्त्वाची व सशक्त, दृढ वैश्विक संस्कार स्मृती लायक आहेत का, हे तपासावे लागते.

**Science of Integral Spirituality**

त्यामुळे, ह्या लेखापुरता अत्यंत संक्षिप्तपणे ह्या संस्काराची पूर्ण व्यवस्था ज्या आध्यात्मिक शक्तीच्या म्हणजे **Integral Spirituality** – 'पूर्णयोग' ह्या तत्त्वांवर आधारलेली आहे त्यांचा परिचय करून घेणे योग्य ठरेल!!

**पातंजल योग दर्शन**

ज्याला आपण 'प्रतीक' म्हणतो त्याला पातंजल योग शास्त्रात 'आलंबन' असे म्हणतात; पण ह्या प्राथमिक स्थितीतील व शारीरिक भूमीवर इंद्रियांच्यामार्फत एक 'ज्ञान' होते. ते ह्या क्षणी केवळ शारीरिक व भौतिक पातळीवर मन व बुद्धीने जाणले जाते!!

ह्या 'ज्ञानाचे परिवर्तन' त्यानंतर 'आत्मिक स्वरावर' वा 'जीवात्म्याच्या भूमीवर' व्हावयाला हवे. हे परिवर्तन योगशास्त्राप्रमाणे (भूः, भुवः, स्वः) तीन व्याहृती व सविता ह्या गायत्रीमंत्रसाधनेने तीन व्याहृतींच्या चाळणीतून उन्नत होऊन Physical, Psychic, Spiritual ह्या तीन स्थितींमध्ये क्रमशः उन्नत व्हावयाला हवे. तेव्हाच व केवळ तेव्हाच ते **'जीवात्म्याच्या भूमीवर'** संक्रमित होऊ शकेल.

त्यानंतर त्या 'प्रतीकाचा' सूक्ष्म ज्ञान व आत्मसंस्कार ह्या पातळीवर उन्नत होण्याचा क्रमही योगशास्त्रात 'संयम' व 'चित्तसंस्कार' ह्या स्थितीपर्यंत पोचल्यावरच त्याचा 'जन्म जन्मांतर' ह्या वैश्विक यंत्रणेवर कायम व दृढ संस्कार होऊ शकतो. (संयम ह्याचा यौगिक क्रिया असा अर्थ अभिप्रेत आहे – सामान्य लौकिकार्थ नव्हे!!)

आई नसते गरीब, कुरूप वा वृद्ध; ती असते प्रेमसमृद्ध.

### नैसर्गीक व यौगिक क्रिया

ह्या क्रिया 'Involantary' पुष्कळ गूढ आहेत आणि ह्या क्रिया विश्वयोजनेत आपसूक होण्याचा कार्यक्रमसुद्धा चालू असतो.

### भारतीय वारसा

पण भारतीय संस्कृतीत ऋषी, मुनी व महायोगी महात्म्यांनी सामान्य मानवाला योगक्रियेने करण्याचे व जाणण्याचे ज्ञान संशोधित करून उपलब्ध केले आहे. हे वैदिक ज्ञान (श्रुती ज्ञान) हा भारताचा **'दैवी वारसा'** अत्यंत मोलाचा आहे!!

या 'ज्ञानाचा' भारतीय वारसा असूनही सध्याच्या समाजाचे त्याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. हे पूर्णपणे दुर्दैवी आहे!!

### Spiritual Research – आध्यात्मिक संशोधन

त्यावर 'आध्यात्मिक संशोधन' होणे आवश्यक आहे. "Spiritual Science" याला जगभर जोपर्यंत 'प्रतिष्ठा' प्राप्त होत नाही तोपर्यंत समाज ह्या 'प्रतीकांच्या' अज्ञानी वापरातून मुक्त होऊन खऱ्या संस्कारांप्रत मार्गक्रमण करू शकणार नाही!!

### पृथ्वीवरील इ.स.२०१४ काळ

त्यामुळे इ.स.२०१४ ह्या वर्षी ज्या तऱ्हेची वैचारिक खळबळ माजून राहिली आहे त्याचे स्वरूप अगदी उथळ स्तरावर अज्ञानी गर्तेत गिरक्या मारत राहणार हे उघड आहे!!

### संस्कार प्रतीके, आत्मबल व दृढ परिवर्तन

त्यामुळे ह्या व अशा अनेक 'प्रतीकांचा' जो खरा हेतू त्या प्रतीकांच्या 'जन्मक्रियेत' सामावला होता व ज्यामुळे समाजाचे 'आध्यात्मिक'–'परिवर्तन','उच्च पातळी संस्कृतीत' होणे अपेक्षित होते, ते प्राप्त होणे अशक्य आहे.

त्यामुळे ह्या प्रकारच्या अनेक 'प्रतीकांच्या' वादाचा वापर केवळ भौतिक स्तरावर राजकीय, सत्ताकारण, आर्थिक लाभ मिळावा, एवढ्यापुरताच होताना पाहणे हा दुर्दैवी योग आपल्याला हतबल होऊन पाहवा लागतो.

ह्या लेखाचा उद्देश ह्या महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधणे हा आहे. ह्या क्रियांच्या पूर्ण ज्ञानाचा मी अधिकारी नाही, पण ह्या एका महत्त्वाच्या ज्ञानाकडे भारतीय समाजाचे लक्ष जावे एवढा लहान टिटवीइतका हा मनस्वी प्रयत्न आहे.

### प्रतिक्रिया अपेक्षित आहेत

यावर काही प्रतिक्रिया याव्यात अशी माझी प्रामाणिक इच्छा आहे. त्यामुळेच व अशा प्रयत्नानेच 'भारत देश व संस्कृती' ही जगाची आदर्शवत व्यवस्था ठरेल आणि भारताला समृद्ध व 'गुरुस्थानी' नेऊन पोचवेल यात संशय नाही!!

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी – २५३६८४५०
मोबाइल – ९००४०५१८४७
E mail : Saneyr1@gmail.com.

●●●

*दिशा संपर्क दूरध्वनी*
**०२२-२५४२ ६२७०**

पुस्तकपरिचय

# नूपुर डंख

*श्री. राम कदम (तळवेलकर) यांच्या नूपुर डंख या काव्यसंग्रहाचे श्रीमती आशा भिडे यांनी केलेले समीक्षण - संपादक*

'नूपुर डंख' - कवी - राम कदम (तळवेलकर), प्रकाशक - शारदा प्रकाशन, ठाणे, मूल्य - १०० रु.

ज्येष्ठ कवी श्री. राम कदम (तळवेलकर) यांची आतापर्यंत बरीच पुस्तके प्रकाशित झाली आहेत. साहित्यातील जवळ जवळ सर्व प्रकार त्यांनी आपल्या लेखणीद्वारे हाताळले आहेत. कादंबरी, कथा, ललित लेखनाचीही त्यांची पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यांच्या काव्याला अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. ठाणे महानगरपालिकेने त्यांना 'ठाणे भूषण' पुरस्काराने सन्मानित केले आहे. चित्रपटासाठीही त्यांनी गीतलेखन केले आहे. २००८ साली कानळदा जळगाव बहिणाबाई-सोपानदेव ग्रामीण साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे.

असे सुप्रसिद्ध व सुपरिचित कवी श्री. राम कदम (तळवेलकर) यांचे 'नूपुर डंख' हे माझ्या मते पंधरावे काव्याचे पुस्तक आहे. मुखपृष्ठावर नूपुरांचा झणत्कार, झनझनाट करणारा नृत्यमुद्रेतील एक पाय दाखवला आहे. मृखपृष्ठाचे पान उलटताच त्यामागे एक स्वप्न पूर्ण झालं... असे शब्द दिसतात. त्याखाली एका माध्यमिक विद्यालयाचा फोटो आहे. वर आपल्याला दिसते एका विद्यालयाचे नाव -श्रीनाथ एज्युकेशन सोसायटीद्वारा संचालित, सुशीला राम कदम प्राथमिक विद्यामंदिर, वरणगाव, ता. भुसावळ, जि. जळगाव, नामकरण सोहळा शुभहस्ते मा. पद्मश्री कविवर्य श्री. ना. धों. महानोरजी, सोमवार २३/२/२००९. त्यानंतर अर्पणपत्रिका, मग ऋणानुबंध - संतोष राणे (प्रकाशक शारदा प्रकाशन) आणि गोवर्धन भोसले.

सुंदर गाणी येता कानी
मला भेटतो माझा ईश्वर
जगणे सुंदर मरणे सुंदर
त्याहून आत्मा असतो सुंदर

अशा काही सुंदर काव्यपंक्ती आपले मन मोहून घेतात. त्यानंतर ऋणनिर्देश व कार्यकारिणी. मग सुरू हाते तो काव्यनूपुरांचा निखळ, नितळ नाद -

'काळजाच्या काठावर' या पहिल्याच कवितेत

काळजाच्या काठावर
जीवनाच्या माथ्यावर
हरवला जीवनसाथी
निळ्या पाणवठ्यावर

आपला जीवनसाथी सोडून गेल्यामुळे विरहव्याकूळ झालेल्या मनाची स्पंदने हळुवार शब्दांत उमटलेली प्रत्ययाला येतात. मानवी जीवनाचा, मनाचा आणि स्वतःचाही तळ व तोल शोधताना त्यांची निर्मिती सर्वंकष अस्वस्थतेची तर कधी वैयक्तिक अनुभूतीची कोरीव लेणी रेखाटते.

निखळता नूपुर डंखाचे
सुखवते पुसाभर नाते
श्वासांमधि श्वास मिसळता
भरकटून दळते जाते

'सावरीचे कापूसगाणे' ह्या कवितेतील ओळी बरेच

काही प्रचितीचे गूज सांगून जातात. कवितेशी असलेले कवीचे घट्ट नाते, तरीही विविध वाङ्मयप्रकारांत तेवढ्याच समर्थपणे केलेले अवगाहन यांवरून कवीची शब्दावरची हुकूमत आणि अनुभवांची सर्वंकषता व सखोलता हा संग्रह वाचताना वाचकांना जाणवते. जीवनाच्या कोलाहलात कवीच्या मनात सतत उमटत गेलेले ताणतणावांचे तरंग त्याचबरोबर स्वतःच्या अंतर्मनाचा आंतरिक स्वर जपण्याचा निःसंदिग्ध असा प्रयत्नही अविरतपणे त्यातून झिरपतो.

'मम मुठीतले आभाळ हरवुनि गेले' किंवा 'मिळतो आहे', 'काठावरती मंदिर सोयरा रे' तसेच 'दीपक जळतो रातदिन', 'सांजवाट' अशा अनेक कवितांतून साथ सोडून गेलेल्या सखीचा मागोवा त्यांचे मन घेत राहते नि आणखीच हळुवार होते हे कवितेच्या शब्दाशब्दांतून जाणवत राहते.

'किडे मुंग्या चघळत चघळत
काळोख रवंथ करतो आहे'

ह्या 'किडे मुंग्या चघळत चघळत' ह्या कवितेतील ओळी मर्ढेकरी कवितेशी साधर्म्य दाखवणाऱ्या वाटतात.

जगण्याच्या कोलाहलात स्वदुःखाचे अनेक पोत ते शब्दांतून प्रकाशमान करतात. ही त्यांची निर्मिती भोवतालचे समग्र भान तोलून तर धरतेच नि त्यातून दुःखाचे एकएक पापुद्रे उलगडत अस्तित्वाचा तळ गाठते. त्यांची कविता कधी चिंतनशीलता व संवेदनशीलतेच्या अंगाने अनुभवांना जिवंत करते तर कधी पारदर्शी बनवून त्यांना आत्मस्पर्शाने भिजवून टाकते. जीवनाचा अस्त हाच जीवनाचा उदय आहे हे 'पैसा पासरी' कवितेतून जाणवते.

काळोख आला गेला काळोख
प्रकाशात मी उजळून आलो
काळ्या मातीत खेळता खेळता
पैसा पासरी मोजून गेलो

असे उद्‌गार सहजपणे शब्दरूप घेतात, जीवनमरणाचा शोध घेतात. आदिम काळोखाच्या उदरात प्रकाशाचे तेजस्वी झोतही आहेत हे त्यांची कविता नूपुर डंखाने कासावीस, अस्वस्थ होऊनही अंतर्मुख होऊन सांगते हे त्यांच्या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

'नूपुर डंख' मधील बहुतांश कवितांवर मृत्यूचे गूढ गहन सावट पसरलेले दिसते. त्यातून आर्त स्वर अस्फुटपणे हुंकारलेला प्रतीत होतो. त्याबरोबरच सात्त्विक चिंतनाची आध्यात्मिक डूबही लाभलेली दृग्गोचर होते. शब्दाशब्दांतून कविवर्य राम कदम यांची कविता वाचक व समीक्षकांना आत्मभान देणारी आहे.

भावावर चंद्रकोर
हाती नाचणारा मोर
अशा रानात उतरे
माझा हरिहरेश्वर

ह्या त्यांच्या शेवटच्या 'वेगळ्याहून वेगळा' या कवितेतील ओळी याची साक्ष पटवतात.

या कवितासंग्रहात कवीला त्यांच्या 'सहस्त्रचंद्रदर्शन' सोहळ्याबद्दल म्हणजे ऐंशी पार करून ऐंक्यांशीव्या (८१) वर्षात पदार्पण केल्याबद्दल त्यांच्या स्वकीयांच्या चार कविता 'रुपेरी शुभेच्छा' म्हणून दिल्या आहेत. त्या संग्रहाच्या तोडीस तोड आहेत. एक रुपेरी शुभेच्छा उदाहरणादाखल –

तुम्ही असे भारदस्त
सतेज पुष्पगुच्छासारखे
तुम्ही असे उत्साही
उगवतीच्या किरणासारखे
मनाच्या फुलदाणीत तुम्ही
स्नेहफुलांचे गुच्छ जपता
भावनांच्या दवबिंदूची

तिरस्कार हा हिंसक वृत्तीचा सूक्ष्म आविष्कार आहे.

हळुवार पखरण त्यावर करता
तुमचं असं असणं
आजही आम्हाला कोडं घालतं
एवढं नीटनेटकं वागणं
फार थोड्या लोकांना जमतं

– दीपाली शिवचरण उज्जैनकर

जीवनमरणाचा शोध घेताना जीवनाचे श्रेय व प्रेय सांगणारी कवी राम कदम यांची कविता वाचकांना अंतर्मुख करणारी आहे. मानवी अस्त व उदय या स्वाभाविक गोष्टी आहेत आणि त्यांना धैर्यानं सामोरं जाणं यातच मानव्य आहे हे गीतेचं वचन शिरोधार्य मानूनच मानवाला जीवनाला सामोरं जायचं आहे नि या मानवजन्मातच परमात्म्याशी तद्रूप व्हायचं आहे हे या कवितांतील अंतस्वरातून भासमान होतं. वाचकांनी त्याचा प्रत्यय जरूर घ्यावा.

**श्रीमती आशा भिडे**
बी/९ विजय अर्पाटमेंटस्,
आराधना टॉकीजजवळ,
ठाणे (प.) ४०० ६०२
दूरध्वनी – २५४१०१४०
भ्रमणध्वनी – ९३२४०४४७६४

●●●

## *वटपौर्णिमा*

वटपौर्णिमेच्या पूजेची तिने केली सगळी तयारी
दारू पिऊन झिंगून तोच आली त्याची स्वारी...

‘आजही आलात पिऊन, आले तिचे बोल
गप्प बस, मुस्कट फोडीन, वाजू लागले ढोल...

पूजेचे ताट बाजूस ठेवून टाकला चहा
तोच मागून आवाज आला ‘काही गिळायचेही पहा’...

भाकऱ्या केल्या दोन तिने घेऊन उरलेसुरले पीठ
रात्रीच्या चटणीबरोबर दिले कांदा आणि मीठ...

‘काढले मला कामावरून’ मोठ्याने तो गरजला
तिच्या ओल्या डोळ्यांतून एकच अश्रू बरसला...

गहाण ठेवण्यासाठी तिने काढला शेवटचा दागिना
मनात विचार चालू होता अजून जायचाय अर्धा महिना...

तो ओरडला जोरात ‘थोडे ठेव दारूसाठी’
नाही म्हणणे शक्य नव्हते, त्याच्या हाती होती काठी...

दोन घरची कामे आज करू जर जास्त
आणखी मिळवू पैसे आपण, तिने विचार केला रास्त...

फाटक्या संसाराला ठिगळे लावण्यात तिचे अर्धे आयुष्य गेले
गळ्यामध्ये चार पोरांचे ओझे होते मात्र आले...

डबडबल्या डोळ्यांनी तिने उचलले पूजेचे ताट
समाजाच्या रूढीप्रमाणे तिने धरली वडाची वाट...

मनोभावे तिने वाचली सत्यवानाची अमर कथा
जरी तिच्या मनामध्ये भरली होती त्याची व्यथा...

सात फेऱ्या घातल्या वडास तिने उपाशीपोटी
डोळ्यासमोर आली काळोखी तरी आयुष्य मागितले
त्याच्यासाठी...

सात जन्म मिळो हाच पती तिने मागितला वर
चक्कर येऊन मात्र ती पडली पारावर...

**मनीषा पाठक**

●●●

# ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत निष्काळजीपणा आणि चिकित्सक / वैद्य यांची मर्यादित जबाबदारी

*आपल्या हक्काबरोबरच जबाबदारीची जाणीव करून देणारा हा लेख वाचनीय आहे. - संपादक*

ग्राहक संरक्षण अधिनियमात इंग्लिश कायद्याप्रमाणे 'निष्काळजीपणा' या नियमाचा समावेश करण्यात आला असून व्यावसायिक तसेच सेवा पुरवणाऱ्या संस्थेकडून करण्यात आलेल्या निष्काळजीपणास जबाबदार ठरवून होणाऱ्या नुकसानाची भरपाईही ग्राहकाला देण्यात येते. प्रत्येकाने दुसऱ्यासमवेत वागताना योग्य ती काळजी व सावधानता बाळगणे गरजेचे असते. आपल्या कृत्यामुळे दुसऱ्यास नुकसान किंवा इजा होणार नाही याची खबरदारी घेणे, हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. तसे न केल्यास तो कारवाई करण्याजोगा निष्काळजीपणा म्हणून गणण्यात येतो व त्याविरोधात न्याय मागण्यात येतो.

ग्राहक संरक्षण अधिनियम हा ग्राहकांच्या हितसंबंधांचे रक्षण करण्याकरता महत्त्वाचा अधिनियम म्हणून गणला जातो. या अधिनियमांतर्गत उपभोक्त्याला तक्रार मांडण्यासाठी त्रिस्तरीय व्यवस्था स्थापन करण्यात आली आहे. उपभोक्ता किंवा ग्राहक या अधिनियमाअंतर्गत सेवेतील कमतरता, मालाची भेसळ व कायदेशीर व्यवहार तसेच अतिरिक्त आकारणी अशा प्रकारच्या विविध गैरकृत्यांमुळे होणाऱ्या नुकसानासाठी व निष्काळजीपणासाठी दोषी व्यक्तीच्या विरोधात दिलासा मागू शकते.

ग्राहक संरक्षण अधिनियम १९८६ नुसार वैद्यकीय सेवा ह्या 'सेवा' या संज्ञेच्या कक्षेत येतात. वैद्यकीय उपचारांकरिता दाखल होणारा रुग्ण हा मोबदला देऊन सेवा घेतो. म्हणून असे उपचार हे 'सेवा' कक्षेत येतात व ग्राहक किंवा रुग्ण अशा सेवेतील कमतरतेसाठी व सेवा पुरवताना झालेल्या निष्काळजीपणासाठी तक्रार करू शकतो. आय.एम.ए. विरुद्ध व्ही. पी. सांथा या प्रकरणात माननीय सर्वोच्च न्यायालयाकडून वैद्यकीय उपचार हे अधिनियमाच्या सेवा या संज्ञेच्या कक्षेत येतात, असा निर्णय देण्यात आला.

एखाद्या विशिष्ट व्यवसायात आपण निपुण आहोत, असे ज्या वेळी एखादी व्यक्ती मानते, त्या वेळी अशा व्यक्तीकडून आपला व्यवसाय पार पडताना आवश्यक ते नैपुण्य वापरले पाहिजे. त्याच व्यवसायात असणाऱ्या इतर व्यक्तींकडून ज्या प्रावीण्याची अपेक्षा असते तेच प्रावीण्य अशा व्यक्तीकडून अपेक्षिले जाते. वैद्य किंवा चिकित्सक हे अशा व्यक्तींच्या सदरात मोडतात. वैद्याने रोग्यावर इलाज करताना आवश्यक ती काळजी व आवश्यक नैपुण्य दाखवावे, ही जबाबदारी त्याच्यावर असते. अर्थात कोणताही वैद्य रोग्याला पूर्णपणे बरा करील याची शाश्वती देऊ शकत नाही. कारण त्याच्यापेक्षा जास्त निष्णात वैद्य असू शकतात; पण कायद्याच्या दृष्टिकोनातून वैद्याने त्याच्याजवळ असलेल्या नैपुण्याचा योग्य तो वापर करून रोग्यावर उपचार केले पाहिजेत.

### निष्काळजीपणा आणि निष्काळजीपणाचा सहभाग

निष्काळजीपणा ही व्यक्ती व मालासंबंधी असलेली अपकृती होय. प्रत्येक व्यक्तीला एखादी कृती करताना ठरावीक प्रमाणात सावधगिरी बाळगावी लागते. जर ती कृती करताना विशिष्ट काळजी घेतली नाही, तर त्यामुळे दुसऱ्यास हानी होऊ शकते व असे कृत्य निष्काळजीपणाने केलेले कृत्य ठरते.

जेव्हा वादी हा प्रतिवादीच्या निष्काळजीपणासाठी फिर्याद करतो, तेव्हा प्रतिवादीच्या निष्काळजीपणात वादीचा काही सहभाग होता का हे पाहिले जाते. जेव्हा प्रतिवादी निष्काळजीपणाने एखादे कृत्य करतो व वादीला त्याची कल्पना असते आणि त्यातून होणारे नुकसान टाळण्यासाठी उपाययोजना असते, तरीदेखील वादी हे नुकसान टाळण्यासाठी त्याला शक्य असलेली उपाययोजना करत नाही व आपणहून नुकसान सहन करतो. त्यालाच 'हानिसहायक दुर्लक्ष' किंवा 'निष्काळजीपणा सहभाग' असे म्हणतात.

रुग्णांच्या निष्काळजीपणा सहभागात खालील गोष्टींचा अंतर्भाव असतो.

१. आपल्या वैद्यकीय उपचारासंबंधी असलेल्या पूर्व इतिहासाची माहिती वैद्याला न देणे.
२. वैद्याला त्याच्या उपचारपद्धतीत योग्य व अपेक्षित सहकार्य न करता दिलेल्या सल्ल्यांचे योग्य अवलंबन न करणे.
३. योग्य वैद्यकीय सल्ल्यानुसार सांगण्यात आलेले उपचार न घेणे.
४. वैद्याच्या परवानगीशिवाय दवाखाना सोडून जाणे.
५. योग्य वैद्यकीय सल्ल्याचा व मार्गदर्शनाचा पाठपुरावा न करणे.

**निष्काळजीपणाचा सहभाग व वैद्यांची मर्यादित जबाबदारी**

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे रुग्ण - जो ग्राहक आहे-अधिनियमानुसार नुकसानभरपाईसाठी वैद्याच्या निष्काळजीपणाबद्दल दावा करू शकतो.

माननीय सर्वोच्च न्यायालयाने सांगितल्याप्रमाणे निष्काळजीपणा या संज्ञेची खालील अंगे आहेत.

१. कौशल्य वापरण्याचे कायद्याने बंधन.
२. त्या कर्तव्याचा भंग
३. त्यामुळे झालेले नुकसान

ग्राहकतक्रार निवारण करणारी यंत्रणा अधिनियमानुसार रुग्णाच्या निष्काळजीपणाचा सहभाग याची दखल घेते व त्यावर वैद्याच्या निष्काळजीपणासाठी मर्यादित जबाबदारी ठरवून जर नुकसानभरपाई मागितली असेल तर, ती योग्य त्या प्रमाणात कमी करण्यात येते.

देवेंद्र सिंग वि. विवेक पाल '२०१३' सी.पी.जे. ४४२ एन. सी. या प्रकरणात राष्ट्रीय आयोगाकडून वैद्याला नेत्र शस्त्रक्रियेतील निष्काळजीपणासाठी दोषी ठरविण्यात आले; परंतु अपिलामध्ये असे आढळून आले की मूळ वादी रुग्ण हा अनियमित कालावधीपासून कोणत्याही वैद्यकीय सल्ल्याशिवाय स्वतःच्या मताने औषधाचे सेवन करीत असे व त्याने तसे करणे थांबविलेही नाही. या प्रकरणात वैद्याची जबाबदारी मर्यादित ग्राह्य धरून नुकसानभरपाईची रक्कम रुपये पन्नास हजार एवढी देण्याचे निर्देश देण्यात आले व रुग्णास सहभाग निष्काळजीपणासाठी दोषी ठरविण्यात आले.

एन. डी. अस्लम वि. आयडियल नर्सिंग होम, १९९७. सी.पी.जे. ८१ एन. एस. या प्रकरणात रुग्ण स्त्रीचे गर्भाशय काढून टाकण्याची शस्त्रक्रिया करण्यात आली आणि तिला योग्य व संतुलित आहार तसेच इतर व्यक्तींना न भेटण्याचा सल्ला देण्यात आला; परंतु वैद्याच्या सल्ल्याला डावलून अनेक व्यक्तींशी भेट, त्वरित शस्त्रकियेनंतर घेतल्याने जखमांना संसर्ग होऊन रक्तस्त्राव सुरु झाल्याने त्वरित शस्त्रक्रियेसाठी नेण्यात आले; परंतु शस्त्रकियेनंतर तिचा मृत्यू झाला.

वैद्यांचा सल्ला व मार्गदर्शनाविरुद्ध केलेल्या कृतीमुळे रुग्णाच्या आरोग्यास धोका निर्माण होऊ शकतो व त्याचे परिणाम हे गंभीर स्वरूपाचे होऊ शकतात. त्यामुळे

योग्य वैद्यकीय सल्ल्याचे पालन करणे व आपल्या आरोग्यास हितकारक उपचारपद्धतीचा अवलंब करणे हे प्रत्येक रुग्णाचे कर्तव्य आहे; परंतु अशा कृत्यामुळे व सहभाग निष्काळजीपणाने रुग्णांचे नुकसान होते. रुग्णाचे निष्काळजीपणाने वागणे कधीकधी वैद्यकीय सेवेत होत असलेल्या निष्काळजीपणात भर घालते व रुग्ण सहभाग निष्काळजीपणासाठी दोषी ठरवला जातो.

सहभाग निष्काळजीपणा हा काही वेळेस अपवादात्मक ठरविला जातो. काही प्रकरणात वैद्याच्या निष्काळजीपणामुळे झालेले नुकसान हे अतिगंभीर स्वरूपाचे असते व त्याची तुलना रुग्णाच्या सहभाग निष्काळजीपणासोबत करता येत नाही, जरी तसा सहभाग निष्काळजीपणा घडला असला तरी, वैद्यकीय सेवा पुरवताना वैद्यांनी केलेल्या निष्काळजीपणाची व्याप्ती ही अधिक प्रमाणात असते.

ग्राहक संरक्षण अधिनियमांच्या नियमानुसार वैद्यांची जबाबदारी ही सहभाग निष्काळजीपणामुळे मर्यादित म्हणून गृहीत धरण्यात येते हे पूर्णतः योग्य व अनुरूप आहे. कारण बेजबाबदारपणे वागणे हे सर्वच ठिकाणी व प्रत्येक वेळी धोक्याचे असते.

ग्राहक संरक्षण अधिनियमानुसार ग्राहकांच्या हक्काबाबत जागरूकता दिसून येते व ते बजावण्यासाठी योग्य ती तरतूद आहे, परंतु ग्राहकांच्या कर्तव्याबाबत मात्र उदासीनता जाणवते. त्यामुळे त्याचे दूरगामी परिणाम हे अप्रत्यक्षरीत्या ग्राहक संरक्षण चळवळीसाठी घातक ठरू शकतात.

कायद्याप्रमाणे ग्राहकांच्या हक्कांसोबत त्यांच्या कर्तव्याचे प्रबोधन अग्रक्रमाने होणे गरजेचे आहे, त्यामुळे जबाबदारीने वागण्याच्या धारणेस प्रोत्साहन मिळेल. रुग्णांच्या ग्राहक प्रबोधनांमुळे नक्कीच रुग्णांना चिकित्सा सुविधांचा अग्रहक्क योग्य प्रकारे बजावता येईल व त्याच्या गुणवत्तावाढीत भर होईल.

वैद्य, दवाखाने, समाजसेवी संस्था यांनी रुग्णांच्या प्रबोधनाकडे लक्ष देणे व त्यांच्या ग्राहक हक्काचे रक्षण करणे गरजेचे आहे.

(नोव्हेंबर २०१३ ग्राहक संरक्षण निकाल या सदरात प्रकाशित झालेले.)

मूळ लेखक : **प्रभारी प्राचार्या. सौ. श्रीविद्या जयकुमार**
मराठी अनुवाद : **सौ. लता किरण सपकाळ**

●●●

*यावर भाष्य हवे...?*



जगात एक विलक्षण सत्य आहे. हे सत्य असं आहे, की तुम्ही स्वतः स्वतःची चूक दुरुस्त केली नाहीत तर दुसरे येऊन तुमची चूक दुरुस्त केल्याशिवाय राहत नाहीत. – स्वामी विद्यालंकार

(कव्हर २ वरून – **संपादकीय)**

बऱ्याच अचुकपणे समजू लागले. तरीही या अभ्यासामध्ये सर्वांत मोठी त्रुटी होती ती म्हणजे, हे बदल का घडत गेले याचे उत्तर, उपलब्ध वैज्ञानिक कारणमीमांसेतून मिळत नव्हते. याच वेळी इतर प्राणिमात्रांच्या अभ्यासामध्ये त्यांचे वर्तन, सामूहिक जीवन आणि शरीररचनेतील 'मेंदू'चा विकास, यांचा परस्परसंबंध, वैज्ञानिकांना अचंबित करीत होता. मधमाशांची सामूहिक जीवनशैली, डॉल्फिनचे सामूहिक संदेशवहन आणि समूहाने पक्ष्यांचे स्थलांतर, यामध्ये कुठेतरी 'उत्क्रांती' आणि 'सामूहिक जीवन' यांमधील नाते प्रकर्षाने समोर येत होते. चिंपांझी, गोरिला, माकड यांच्या कळप करून राहण्याच्या प्रवृत्तीच्या अभ्यासातूनही 'समूहजीवन' आणि 'मेंदू' यांच्या परस्परसंबंधावर नवीन प्रकाश पडत होता. यामुळेच माणसाचे सांस्कृतिक जीवन, सामूहिक चलनवलन, आणि त्यांच्या मेंदूचा विकास नि उत्क्रांती यांचे नाते, आधुनिक विज्ञानाला नजरेआड करणे अशक्य होऊ लागले.

गेल्या ५० वर्षांत, मस्तिष्कविज्ञानमध्ये मेंदूवरच्या संशोधनाने प्रचंड क्रांती केली आहे. हे संशोधन मेंदूच्या रचनेपुरतेच मर्यादित न राहता, 'रचना' आणि 'कार्य' यांच्याशी निगडित आहे. त्यांच्या परस्परसंबंधातील संशोधनामुळे मानवी उत्क्रांतीच्या संशोधनाला वेगळी दृष्टीच मिळाली. मानसशास्त्र आणि समाजशास्त्र हे या संशोधनाचे अविभाज्य भागच बनले. 'रानटी' अवस्थेतून 'शहरी' अवस्थेत संक्रमित होत असतानाच त्याच्या मेंदूच्या क्षमतांना नवीन आव्हाने मिळू लागली. आदिमानवाच्या सुरुवातीच्या अवस्था आणि आजचा मानव यांच्या मेंदूच्या 'आकारमाना'मध्ये तिपटीने वाढ झाली आहे. आजच्या मानवामध्ये साधारणपणे त्याच्या वजनाच्या २% वजन त्याच्या मेंदूचे असते, पण निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा २०% भाग मेंदू वापरतो. थोडक्यात मानवाचे सामूहिक जीवन, सांस्कृतिक जडणघडण आणि मेंदूची वाढ नि विकास यांचे अतूट नाते आजच्य संशोधनाने सिद्ध केले आहे.

इंग्लंडमध्ये १९०२ साली मानव आणि समाजशास्त्राच्या अभ्यासाकरता ब्रिटिश ॲकॅडॅमी स्थापन झाली. २००२ साली या संस्थेला १०० वर्षे पुरी झाली, म्हणून त्यांनी एक अतिशय महत्त्वाचा संशोधनप्रकल्प हाती घेतला. त्या प्रकल्पाचे शीर्षक होते, "Lucy to Language : The Archeology of Social Brain". २००३ ला चालू झालेला हा प्रकल्प, ७ वर्षांनी म्हणजे २०१० साली पुरा झाला. या प्रकल्पामध्ये वेगवेगळे ३० संशोधक आणि इंग्लंडमधील ५ विद्यापीठे सामील झाली होती. या प्रकल्पाच्या शीर्षकातील "Lucy" या नावाचा इतिहासही फार रंजक आहे. इथिओपियाच्या उत्तरपूर्वेकडील वाळवंटामध्ये १९७४ साली डॉन जॉन्सन (Don Johanson) या मानववंशशास्त्रज्ञाला ऑस्ट्रॅलोपिथीसिन (Australopithecine) या नामशेष झालेल्या आदिमानवाच्या जातीचे काही अवशेष मिळाले. हे उत्खनन करत असताना हे महाशय बीटल्स यांचे प्रसिद्ध, Lucy in the sky with diamonds हे गाणे ऐकत होते. अजुनपर्यंत उपलब्ध असलेल्या सांगाड्यांच्या अवशेषांमध्ये हे अवशेष वेगळे होते. संशोधकांच्या मते हे आदिमानव सुमारे ३५ लाख वर्षांपूर्वी तेथे वावरत असावेत. आजच्या मानवाचे वैशिष्ट्य म्हणजे त्याचे 'भाषे'चे अंग, म्हणून या प्रकल्पाचे नाव Lucy to Language असे ठेवण्यात आले. या प्रकल्पाने मानवाचे समाजजीवन आणि त्याच्या मेंदूचा आकार यांचा परस्परसंबंध दाखवून दिला (Social Brain Hypothesis). सर्वसाधारणपणे व्यक्तीचा हा मित्रपरीघ किंवा परिवार १५० चा असतो असे डनबर (Dunbar) या संशोधकाने अनेक प्रयोग आणि निरीक्षणांने दाखवून दिले. साहजिकच या सिद्धान्तावर जेवढी चर्चा

ज्या देशात स्वतः विणलेले वस्त्र वापरत नाहीत, स्वतःच पिकविलेल्या धान्याची भाकरी खात नाहीत आणि त्या राष्ट्राचे तुकडे उडाले आहेत, ज्यांतील प्रत्येक तुकडा स्वतःलाच राष्ट्र समजत आहे, ते राष्ट्र अनुकंपनीय होय.

वाढेल, तेवढ्या त्यामधील त्रुटी किंवा या तर्कामागील कमकुवतपणाही दृश्य होईल. डनबर आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या या संशोधनाकरता वापरण्यात आलेला समाज हा विकसित पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाखाली वावरणारा समाज आहे. त्यामुळे निसर्गतःच यामध्ये सांस्कृतिक पक्षपात (Bias) असण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरीही माणसाच्या उत्क्रांतीच्या संशोधनामध्ये हा एक मोठा टप्पा आहे यात शंका नाही.

उत्क्रांतिवादाचा अभ्यास काय किंवा मानसशास्त्र, समाजशास्त्रासारख्या मानव्यविज्ञानाच्या शाखा काय, भारतीयांचे या संशोधनाला अल्पसेही योगदान नाही. मूलभूत संशोधनाकरता स्वतंत्र प्रज्ञेची गरज असते. प्राचीन भारताच्या इतिहासामध्ये, भाषेपासून गणितापर्यंत अनेक विषयांमध्ये अशा उत्तुंग प्रतिभेचे संशोधक होऊन गेलेले दिसतात. उपलब्ध साधनांमधून एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते, ती म्हणजे अशा 'सर्जनशील' समूहाच्या निर्मितीकरता प्राचीन भारतामध्ये केले गेलेले सामूहिक प्रयत्न. भाषा, स्थापत्य, शिल्प, कला, न्याय संकल्पना, व्यापार, निति-अनिति या सर्वांची निर्मितीही माणसाच्या समुहिक जीवनातूनच होत असते. ज्याला आपण 'संस्कृती' म्हणतो त्याचीच ही वेगळी, पण एकमेकांमध्ये गुंतलेली अंगे आहेत. 'व्यक्ती' आणि 'समाज' या दोन्ही स्तरांवर सुसंवाद आणि आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न, सामाजिक नियम आणि बंधनातून निर्माण होत असतो. याचाच एक भाग म्हणजे सामाजिक 'गरजा' आणि 'क्षमता' यांवर आधारित समाजरचना. भारतातील 'जाती' आणि 'वर्णव्यवस्था' यांचा गाभा हा 'सामाजिक' विचारच आहे.

बुद्धाचा मध्यममार्ग, नागार्जुनाचा शून्यवाद, महावीरांचा अनेकांतवाद आणि वैदिकांची षड्दर्शने ही नुसती बौद्धिकच नाहीत, तर प्रत्यक्ष 'भौतिक' जीवनाला दिली गेलेली मार्गदर्शक सूत्रे आहेत. आत्यंतिक आत्मकेंद्रित, स्वैराचाराच्या जवळ जाणारे स्वातंत्र्य, अशा पाश्चात्त्य संकल्पनांच्या ती बरोबर विरोधी आहेत. बहकलेली 'मूक्ती' चळवळ, आणि पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण, यांमुळे 'कुटुंब' आणि 'लग्न' या दोन्ही सामाजिक संस्थांची आपण वाताहत केली आहे. या दोन्ही आणि तत्सम सामाजिक संस्थांच्या उभारणीत संयम, सहिष्णुता आणि नेतृत्वगुणांची मशागतच होत असते.

दुर्दैवाने स्वातंत्र्यानंतर भारताच्या मानव्यविज्ञानाच्या संशोधनक्षेत्राला डाव्या विचारसरणीने व्यापून टाकले. यातूनच संस्कृतिभंजन आणि समाजशास्त्राच्या अभ्यासाचे 'विकृती'करण चालू झाले. भारतीयांनी आपल्या इतिहासाकडे जरी डोळसपणे पाहिले, तरी आजच्या या नवीन मानसशास्त्र, समाजशास्त्राच्या संशोधनाला ते मोठा हातभार लावू शकतील. किमान, सुधारणेच्या नावाखाली परंपरांची आंधळेपणाने मोडतोड न करता डोळसपणे त्यांच्याकडे बघून, त्यांतल्या 'शाश्वत' मूल्यांचा आदर करायला तरी ते शिकतील. सकारात्मक मानवी उत्क्रांतिकरता ते पूरक आणि आवश्यकही आहे.

**- विजय वा. बेडेकर**

●●●

दिशा
नियमित
वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*

---

शहरे आणि गावे माणसांसाठी खास काही करतात असे नाही; पण कर्तबगार माणसांमुळे गावाला नाव मिळते आणि गावकऱ्यांना अभिमान.

# बखर

*बखर हा मराठी वाङ्मयातला एक वेगळाच लेखनप्रकार आहे. या लेखनप्रकाराची ओळख लेखकाने करून दिलेली आहे. – संपादक*

प्राचीन मराठी वाचकपरंपरा प्रदीर्घ असली तरी गद्य वाङ्मय अति अल्प प्रमाणात आहे. महानुभावपंथीय लेखकांचे गद्य ग्रंथ, पेशवेकालीन पत्रव्यवहार इ. तुरळक गद्य निर्मिती दिसते. बखरवाङ्मय हा गद्य वाङ्मयाचा अति समृद्ध विभाग आहे. मुसलमानांच्या तत्त्वविचारांपासून व इतिहासकथनाच्या गरजेतून बखरवाङ्मयाची निर्मिती झाली व खऱ्या शब्दाची व्युत्पत्ती खबर वस्तुतः बखर व बक् वस्तुतः बखर अशी सांगितली जाते. बखरवाङ्मयाला शालिवाहनाची बखर यादवांच्या बखरींची पूर्वपरंपरा दिसते. या वाङ्मयाचे स्वरूप तीन प्रकारचे आहे. समकालीनांनी लिहिलेल्या आख्यायिका, दंतकथा इ. च्या आधारे लिहिलेल्या व जुन्या कागदपत्रांद्वारे लिहिलेल्या.

शालिवाहनाप्रमाणे बखरवाङ्मय स्वयंपूर्ण नसून परप्रेरित आहे. कुणाच्यातरी सांगण्यावरून ही निर्मिती झाली आहे. बखर म्हणजे पत्ररूपाने लिहिलेला एक दस्तऐवज असल्याने सुरुवात व शेवट पत्रात्मक असतो. पुराणकथा हा आदर्श या वाङ्मयासमोर असल्याने बखरीत अनैतिहासिकवाद अधिक दिसतो. ऐतिहासिक दृष्टीच्या अभावाप्रमाणेच वाङ्मयीन दृष्टीचाही फारसा आढळ होत नाही. बहुतेक बखरकारांचा कारकुनी हा पेशा असल्याने साहजिकच पांडित्य, चिकित्सा, भाषाप्रभुत्वादी कौशल्यांचे दारिद्र्य दिसते. बखरवाङ्मयावर फारशीचा प्रभाव दिसतो. कालगणनाही हिजरी आढळते. ऐतिहासिक व्यक्तिचित्रणाच्या दृष्टीने भाऊसाहेबांची बखर महत्त्वाची आहे. बखरवाङ्मयात ऐतिहासिक सत्य व असत्य यांची इतकी सरमिसळ झालेली असते की ऐतिहासिक सत्य बखरींवरून ठरविणे फार जड जाते. त्या मानाने भाऊसाहेबांची बखर ही बरीच खात्रीलायक आहे.

बखरवाङ्मयाचा उगम साधारणतः मराठी राज्याबरोबरच झाला. शिवपूर्वकाळातील म्हणून समजण्यात येणाऱ्या 'बिंबस्थान' उर्फ 'ठाण्याची बखर' (१३ वे शतक) व तालीकोटच्या लढाईची बखर (शके १४८६ चा सुमार) या दोन बखरी उपलब्ध असाव्यात. वरील ३ प्रकार राजवाड्यांनी कल्पिलेले आहेत.

मुसलमानांच्या सहवासाने त्यांच्या तवारिखा पाहून मराठ्यांनीही बखरी लिहिण्याचा प्रघात पाडला. जुन्यात जुनी बखर शालिवाहनाची होय असे राजवाडे मानतात.

**बखर–बाह्यरंग** – राजकीय इतिहासकथन हे बखरींचे खरे स्वरूप. हे लेखन गद्यात्मक आहे. माहीमची बखर मात्र गद्यपद्यमिश्रीत आहे. गद्यात्मक मजकूर हा पद्यापेक्षा अधिक निश्चित स्वरूपाचा असल्याने बखरकारांनी गद्याचा आश्रय घेतला असावा. मुसलमानी इतिहासाचा आज्ञेवरून लिहिण्याचा विशेष मराठीत संक्रांत झाल्याने बखर कोणातरी राजकीय पुरुषाज्ञेने लिहिली जाई. बहुतेक बखरी अशा पोष्ययांकभावाने लिहिला जात हा त्यांचा विशेष होय. बखरीचा दुसरा विशेष हा की, तिची सुरुवात पुराणपद्धतीची (वंश इतिहास इ.नी) असे. पण शिवोत्तरकाळात हा प्रकार कमी दिसतो. सुरुवातीप्रमाणेच शेवटाचेही वैशिष्ट्य म्हणजे बखरीची फलश्रुती सांगणे.

**बखर अंतरंग** – अंतरंगाचा पहिला विशेष वैशिष्ट्यपूर्ण लेखनशैली हा सांगता येईल. हा गुण बखरलेखनाच्या प्रौढ

कर्ज काढणे, हे एक जड वस्तू डोंगरमाथ्यावरून खाली लोटून देण्याइतके सोपे आहे; परंतु ते फेडणे म्हणजे तीच वस्तू खालून डोंगरमाथ्यावर वाहून नेण्याइतके कष्टप्रद आहे.

पण रसाळ भाषापद्धतीत व्यक्त होतो. फारशी शब्दांचे अधिकत्त्व आजच्या दृष्टीने शिथिल वाक्यरचना, दीर्घवाक्यरचनेपेक्षाही लघुवाक्यरचनेकडे अधिक कल. सुटी वाक्ये परिणामदृष्ट्या उपयोगी असून त्यांत एकच एक कल्पना आल्याने अर्थग्रहाणाच्या दृष्टीनेही ती महत्त्वाची ठरतात. जमाखर्चाची पद्धती हा बखरकारांचा सर्वसामान्य संकेत आहे. हरिदासी भाषेचा अस्खलित ओघ, अत्युक्ती हे बखरीचे एक अंग आहे. हा पौराणिक कथांचा एक परिणाम असावा. परंपरेने आलेल्या माहितीस प्राधान्य असते. घटनानुक्रम, कालानुक्रम इ. बाबींमुळे बखरीतील इतिहासाला एक पद्धती व संगतवारपणा आलेला असतो. पत्रांच्या साहाय्याने अशी संगती जुळवून घ्यावी लागते. गुणसंकीर्तन ही बखरकाराची भूमिका असल्याने पक्षनिष्ठपणाही त्यात येतो. आटोपशीरपणा हा वाङ्मयीन गुण बखरीत दिसतो. भावनात्मकता हा बखरींचा प्राण होय. बहुतेक बखरी या स्मृतीवर हवाला ठेवून लिहिल्या गेल्याने काल, व्यक्ती व प्रसंगविपर्यास दिसतो. तद्वतच रंजकत्व हा हेतू असल्याने अत्युक्ती व कल्पकतेचा आधार बखरकार घेतो. कथनपरता किंवा आख्यानपात्मक स्वरूप हे केवळ विषयामुळे नाही तर लिहिण्याच्या पद्धतीमुळे प्राप्त होते. महत्त्वाचे तंत्र म्हणजे सुंदर मांडणी, यामुळे बखरीचे कलात्मक मूल्य वाढले आहे.

**बखरकाराची भूमिका** : स्वकीयांसंबंधी अभिमानाची भावना ही बहुतेक बखरकारांची भूमिका होय. किंबहुना ती त्यांची महत्त्वाकांक्षा होती. प्रदीर्घ लिखाणास आवश्यक असणारी त्या वेळची परिस्थिती, पात्रता त्यांच्या भूमिकेस भक्कम करीत.

**इतिहास म्हणजे काय** – ज्या विविधावस्थांतून समाज गेला असेल त्या अवस्था, ज्या कल्पनाविकारांसाठी त्या समाजाच्या कार्याचे स्वरूप निश्चित केले असेल ते कल्पनाविचार, तसेच जी जी विशिष्ट भौतिक परिस्थिती समाजोपकर्षास कारणीभूत झाली असेल ती परिस्थिती, इतक्या सर्व गोष्टींचा अंतर्भाव 'इतिहास समाजजीवनाचे चित्र या वाक्यात होतो.' सत्य हे इतिहासाचे अधिष्ठान असल्याने वस्तुनिष्ठ दृष्टीची इतिहासलेखनात आवश्यकता असते. ते एक सामाजिक शास्त्र म्हणून आदर्शवादी शास्त्र कसे असले पाहिजे याच दिग्दर्शन करणारे आहे. इतिहासाचे ध्येय जीवनविकास आहे. आत्मनिष्ठ वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून इतिहासलेखन झाल्यास ते रूक्ष होत नाही.

इतिहासाच्या ज्ञानाने अनुभवक्षेत्र विशाल होऊन संस्कृतीची जोपासना होते. एखाद्या राष्ट्राची संस्कृती इतिहासावरून दिसून येते. संस्कृतिमापनाचे गमक म्हणजे इतिहास होय.

**बखरींचे ऐतिहासिक स्वरूप** – बखरींचा जन्म राजकीय वातावरणात झाला हे जितके खरे, तितके त्यांचा जन्म एका विशिष्ट ऐतिहासिक गरजेपोटी झाला. स्वकीयांच्या कर्तृत्वाची प्रामाणिकपणे केलेली ती नोंद आहे.

उत्तरकालीन लिखाणामुळे ऐतिहासिक सत्य वादातीत आहे, हे मानले तरी त्यांचे ऐतिहासिक प्रामाण्य विशिष्ट मर्यादेपर्यंत मानावयास हवे.

**इतिहासाचे कलात्मक अंग** – ऐतिहासिक घटनांच्या जुळणीत शास्त्रीय व त्यांच्या निवेदनात कलात्मक अशी दोन्ही अंगे इतिहासाला असतात. इतिहासाचे ज्ञान हा बुद्धिवादी दृष्टिकोन असून त्याची उपयुक्तता ही सौंदर्यवादी, कलात्मक दृष्टिकान आहे. बखरींचे लेखन शास्त्रीय भूमिकेने झालेले नसले तरी विविध साधने वापरून केलेल्या ऐतिहासिक घटनांच्या जुळणीत इतिहासशास्त्राचे अंग दिसून येते. तर निवेदनात कलात्मक अंगही बखरीत दिसते.

**वाङ्मय म्हणजे** – वाङ्मयात अक्षयी भावनांचे वर्णन असून विषय व मांडणी चित्तवेधक असतात. केवळ ज्ञानच नव्हे तर स्थलकालनिरपेक्ष आनंद वाङ्मयापासून मिळतो.

वाङ्मयाची भावनिक, काल्पनिक व बौद्धिक अशी तीन मुख्य अंगे असतात. शैली हा वाङ्मयाचा प्रमुख घटक असतो. भावनाविष्काराच्या दृष्टीने शैलीचे महत्त्व अनन्यसाधारण असते. विषय, मांडणी व परिणाम हे वाङ्मयकलेचे तीन घटक. वाङ्मयाचा दर्जा ओळखण्याची ही गमके होत.

**बखरींचे वाङ्मयीन स्वरूप** – वाङ्मयीन भूमिकेने लिखाण झाले नसले तरी बखरीत वाङ्मयीन गुण आढळतात. पहिला विशेष म्हणजे बखरकारांचे वर्ण्य विषयाशी तादात्म्य. हे तादात्म्य व निवेदनाचा प्रामाणिकपणा यामुळे रसोत्कटता हा गुण येतो. कथावस्तूची आकर्षक मांडणी, उत्कृष्ट भाषाशैली, या दृष्टीने अर्थवाहकता व ध्वनिवाहकता लक्षात ठेवण्यासारखी आहे. उदा. दत्ताजी शिंद्यांच्या मृत्युवर्णनातील वा बळवंतराव मेहेंदळ्यांच्या पराक्रमवर्णनातील ओघवत्या भाषेबरोबरच अर्थवाहकतेचा प्रत्यय येतो. भाषाशैलीच्या दृष्टीनेच अर्थानुकारी वा ध्वन्यानुकारी शब्दयोजना आवश्यक असते. प्रसाद, ओघ व माधुर्य, आत्मविस्मृती हा ललित कथाकारास विशेषतः नाटककारास आवश्यक असणारा गुण बखरकारात दिसतो. त्यामुळे बखरीतील व्यक्तिमत्त्वे अमरत्वास पोचतात. वाङ्मयदृष्ट्या सर्वच बखरी सारख्याच योग्यतेच्या नसल्या तरी स्वतंत्र गद्यलेखनाचा प्रकार होण्यास लागणारे त्यांतील साहित्यगुण मान्य केले पाहिजेत.

पानिपतच्या युद्धाने भाऊसाहेबांच्या बखरीचा १/३ भाग व्यापला असून बाकीच्या भागात युद्धपूर्व काळातील उत्तरेतील मराठ्यांच्या राजकारणाचा भाग आहे. ही बखर लढाईनंतर २ वर्षांनी लिहिलेली असल्याने हिला समकालीन बखर म्हणून संबोधणे योग्य होईल. व्यक्तिवर्णन प्रत्यक्षाप्रत्यक्ष पद्धतीने केलेले दिसते. तसेच वस्तुवर्णनेही उल्लेखनीय आहेत. उदा. तो दुर्ग असाध्य, सलाबत, मोर्चे लावून सुरुंग लावावे तरी राव रेतीचे, सुरुंगास यंत्र नाही. तोफ तीच धरली तर गोळा रेतीत जातो. घटनावर्णनही उत्कृष्ट आहे. उदा. दत्ताजी शिंद्यांचे मृत्युवर्णन, सत्याची अनुभूती आणून देणे हे या बखरीतील घटनावर्णनांचे वैशिष्ट्य होय. वातावरणनिर्मितीच्या दृष्टीने बखरकाराने दुय्यम व्यक्तींचा पार्श्वभूमी म्हणून उपयोग केलेला दिसतो. स्वकीयांबद्दलचा अभिमान (त्यासही मल्हारराव यांची मर्जी नक्कीच होती की मल्हाररावाने बोलील ते करील यात संदेह नाही) व परकीयांविषयी तिरस्कार (नजीबखान रोहिला मागमनी. जन्मस्थानी लघुशंका करणारा) दर्शवणारी वाक्ये, सुभाषितांची सुंदर पखरण (भाग्यअभाग्य कालपरत्वे येते जाते, स्त्रीबुद्धी प्रलमं गता).

**बखरींची शैली** – शैलींचा विचार करीत असता १) विचारसौंदर्य (असंदिग्ध) २) भावनासौंदर्य ३) रसोत्कटता ४) व्यक्तित्व ५) वक्तृत्व ६) सुबोधता ७) परंपरा साहचर्य ७) जीवनानुभूतीविषयी आवेश ९) संयम १०) उदात्तता ११) वैचारिक क्रम १३) पारिभाषिक शब्द १३) व्याकरणदृष्ट्यां रचना इतक्या मुद्यांचा प्रामुख्याने विचार आवश्यक असतो.

(मराठी बखर : र. वि. हेरवाडकर)

**बखरसाहित्याचे वर्गीकरण** :

१. चरित्रआख्यानपर बखरी : सभासदाची बखर, ९१ कलमी बखर, सप्त प्रकरणात्मक चरित्रे इत्यादी.

२. प्रसंगवर्णनपर : पानिपतची बखर, राक्षसतागडीची बखर इ.

३. वार्तापत्रे : १७३८ सालची हकिकत, होळकरांची थैली इ.

४. उपदेशप्रधान साहित्य : नारायण व्यवहार शिक्षा, आज्ञापत्र

५. सांप्रदायिक व भक्तिपर : हनुमंतस्वामीची बखर, जयरामस्वामीची बखर.

धर्मरक्षणाची प्रेरणा हे बखरींच्या निर्मितीचे आदिकारण आहे. विशिष्ट काळ व राजकीय परिस्थितीने या प्रेरणेची आवश्यकता निर्माण केली होती. पुराणांच्या पाच लक्षणांपैकी वंशानुचरित हे एक लक्षण मानले आहे.

---

आपल्या खऱ्या गरजा तिळाइतक्याच असतात. आपण निर्माण केलेल्या मात्र पर्वताएवढ्या असतात.

(सर्गश्चप्रतिसर्गश्च वंशो मन्वंतरानिच। वंशानुचरितं च एव पुराणं पंचलक्षम्...मत्स्यपुराण) केवळ इतिहासकथन आणि वृत्तातनिवेदन एवढेच बखरकारांचे उद्दिष्ट असते तर ऐतिहासिक पुरुषांचे चरित्र लिहिताना त्यांना पुराणांचा आश्रय करण्याचे कारण पडले नसते, पण ही पुराणशरणता बखरकारांची पुराणसदृश साहित्य निर्माण करण्याची जाणीव व्यक्त करते. पूर्वी धर्मरक्षणार्थ होऊन गेलेल्या अवतारांप्रमाणेच आधुनिक काळातील पुरुषांचे कार्य धर्मरक्षणाचेच असल्याने त्यांचे चरित्रलेखन करण्याची जाणीव बखरकारांत होती. पुराणोक्त धर्मरक्षणाची प्रेरणा बखरकारांना लेखनप्रवृत्त करीत असल्याने चरित्रविषयी भूत व्यक्तींकडे व कार्याकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन 'धर्मस्थापनेचे नर : ते ही ईश्वरी अवतार' अशा स्वरूपाचा होतो. त्यामुळे चरित्रआख्यानपर बखरींना पुराणोक्त वंशानुचरित्राचे वळण लागणे स्वाभाविक होते. या दृष्टिकोनास अनुसरून भाऊसाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाचे चित्रण 'भाऊसाहेबांच्या बखरीत' आलेले आहे. (नानासाहेब व भाऊसाहेब ईश्वरी अंश अवतार धरून या कलियुगी उभयतांनी चरित्रे केली). ही बखर वरवर प्रसंगवर्णनपर आहे. पण तिची गणना चरित्राख्यानपर बखरींत होते असे श्री. रं. कुलकर्णींचे मत आहे. कारण सर्व घटनांचा मध्यवर्ती केंद्र भाऊसाहेबांच्या व्यक्तित्वाचा फेर धरूनच आहे असे कुलकर्णी यांचे म्हणणे आहे.

मराठी गद्याला प्रारंभ झाला शालिवाहनाच्या दहाव्या शतकात. आजच्या उपलब्ध साहित्यानुसार श्रीपतिभट्टाची 'ज्योतिषरत्नमाला' हा मराठी साहित्याचा व गद्यवाङ्मयाचा पहिला ग्रंथ ठरतो. १८१८ पर्यंतच्या गद्याचा विकास पाहता तो तीन प्रवृत्ती प्रेरणांनी व्यापलेला दिसतो. १. टीकाभाष्यात्मक पंडिती परंपरा. २. कथाप्रधान गद्य साहित्य आणि ३. पौराणिक परंपरेतून उदयास आलेले बखरवाङ्मय. बखरसाहित्य तसे कथाप्रधानच, पण या साहित्याची प्रेरणा तसेच आदर्शही निराळे आहेत. महाराष्ट्र यवनाक्रांत झाल्यानंतर धर्मपालनाइतकेच परधर्मापासून स्वधर्माचे संरक्षण होणे अगत्याचे होऊन बसले. निष्प्रभ समाजजागृती करण्यास धर्मरक्षणाची प्रेरणा समर्थ होती. अवतारावरील श्रद्धापुराणे, गीता, संतसाहित्य यांनी आधीच जोपासली होती आणि बखरी या ध्येयवादाचाच आविष्कार होत. ही प्रेरणा शब्दांकित करताना त्यांनी पुराण साहित्याचा कथात्मक घाट उचलला. कथाकथनपर शैली व पांडित्याचा बखरीत समन्वय दिसतो तो यामुळेच.

साहित्यगुण, या पौराणिक परंपरेचे विकसित स्वरूप आणि इतिहासकथन या सर्वच दृष्टींनी भाऊसाहेबांची बखर समृद्ध आहे, पण या बखरीनंतर मात्र बखरसाहित्यास उतरती कळा लागल्याचे दिसून येते. मराठ्यांच्या स्वातंत्र्यनिष्ठेचा परमोत्कर्ष पानिपतच्या संग्रामामध्ये आढळतो व त्या दृष्टीने हे स्वाभाविक वाटते.

(प्राचीन मराठी गद्य : प्रेरणा आणि परंपरा – पौराणिक परंपरा – श्रीधर रंगनाथ कुलकर्णी)

महिकावतीची बखर व वर्पलकोटची बखर या दोन शिवपूर्वकाळातील बखरी सोडल्यास १६९७ सालापर्यंत बखरलेखन झालेले दिसत नाही. १६९७ साली कृष्णाजी अनंत सभासदकृत शिवछत्रपतींचे चरित्र सांगणारी बखर सापडते. बाकीच्या बखरी उत्तर पेशवाईत आणि कैफियती म्हणून इनाम कमिशनला सादर करण्यासाठी अव्वल इंग्रतीत लिहिल्या गेलेल्या दिसतात. – लेखन काल

महिकावतीची उर्फ माहीमची बखर ही वस्तुतः निरनिराळ्या सहा प्रकरणांचा (बखरवजा गद्यपद्य) समाहार आहे.

१) गद्यपद्यात्मकता २) वंशावळ वर्णन ३) वंशवर्णनाबरोबर व्यक्ती व प्रसंग यांचे बारीक तपशीलवार वर्णन ४) बहुश्रुतता हे या बखरीचे विशेष असून पुढील बखरीतही ते दिसतात – पहिली बखर.

बखरलेखनाची सुरुवात इतिहास म्हणून झालेली दिसत असली तरी इतिहास या दृष्टीने बखरी गौण आहेत. ज्या कारणामुळे बखरी ऐतिहासिक प्रामाण्याच्यादृष्टीने गौण ठरतात त्याच कारणामुळे त्यात ललिताचे काही गुण दिसतात. उदा. चरित्रनायकाबद्दल आदर, सजविण्याचा भाग, बखरकारांच्या चिटणिशीच्या पेशामुळे येणारी लेखणीतील वाकबगारता – सामान्य स्वरुप

व्यक्तिचित्रण – भाऊ, दत्ताजी, स्त्री.

प्रसंगवर्णन – जयाजी शिंदेचे मरण, बळवंतराजाचे मरण, भाऊचे पराक्रम.

स्थलवर्णन – आग्र्याचा किल्ला.

युद्ध – शिंदे दुराणी, शिंदे बिपे सिंग, भाऊचा हल्ला, कुंजपुरा, पानिपत

भयानक रस – मुसलमानी क्रौर्य, करुण – विश्वासराव मेला, वीर – कुंजपुरा

भाषा – उपमा दृष्टान्त, अर्थगर्भ वाक्ये, लहान वाक्य, नाट्यमय संवाद, बहुश्रुतता, म्हणी, पौराणिक दाखले हा.

युद्धवर्णनात्मक बखरींत सामान्यपणे बसू शकणारी, पण विशेषतः कोणत्याही विशिष्ट प्रकारात न मोडणारी आणि शिवाय साहित्यिकदृष्ट्या उत्कृष्ट ठरणारी बखर म्हणजे भाऊसाहेबांची बखर होय. ही बखर केवळ पानिपतच्या युद्धावर नसून १७५३ साली रघुनाथरावाने जाटाच्या कुंभेरीवर स्वारी केल्यापासून ते १७६१ पानिपतच्या वार्तेने नानासाहेबाने भाऊ भाऊ करीत प्राण सोडला व थोरल्या माधवरावास पेशवाईची वस्त्रे मिळाली तेथपर्यंत पेशव्यांनी उत्तरेत केलेल्या राजकारणाची प्रत्ययकारी हकिकत देणारी ही बखर आहे.

प्रस्तुत बखरीचे सरळ दोन भाग पडतात.


१) कुंभेरी प्रकरणी शिंदे-होळकर बेबनावापासून दत्ताजींच्या वीरमरणापर्यंत.

२) शिंद-होळकरांच्या इच्छेविरुद्ध अब्दालीच्या पारिपत्यार्थ भाऊसाहेब उत्तरेत आल्यापासून पानिपतच्या युद्धात मराठ्यांचा न भूतो न भविष्यति असा पराभव होईपर्यंत.

या दोन्ही भागांतील करुण भीषण प्रसंगांना जोडणारा व त्यातून एक सलग शोककथा गुंफण्यास मदत करणारा दुवा म्हणजे मात्रागमनी करून एखाद्याचा फर्जी होणारा नजीबखान रोहिला, साऱ्या शोकनाटकाला कारण झालेला कुटिल कारस्थानी खलनायक आणि त्याच्या कारस्थानाला बळी पडलेले या शोकनाटकाचे प्रमुख नायक म्हणजे प्रथमार्धातील दत्ताजी शिंदे व उत्तरार्धातील भाऊसाहेब हे होत.

•••

**छत्रपती शिवाजी महाराजांची जन्म कुंडली**



# विज्ञान दिन विशेष

*मे महिना आपल्याकडे उकाड्याचा असला तरी वैज्ञानिक प्रगतीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. या महिन्यातील काही महत्त्वाचे विज्ञानदिनांची माहिती या संकलनात आढळते - संपादक*

- सँडिॲगो रेंमन, (१८५२) स्वीडिश डॉक्टर. मज्जापेशी व मज्जासंस्थेच्या सखोल संशोधनाबद्दल १९०६ मध्ये कॅमिलो गोल्डीसह नोबेल पुरस्कार.
- 'अलिंबड' या भूस्थिरकक्षेतील उपग्रहाद्वारे १९६५ मध्ये व्यापारी तत्त्वावर टेलिव्हिजन प्रसारण.
- स्टीव्हन वारानबर्ग, (१९३३) अमेरिकन पदार्थवैज्ञानिक. न्यूट्रल करंट सिद्धान्ताचा जनक.
- थॉमस हक्सले, (१८२५) ब्रिटिश जीवशास्त्रज्ञ, विज्ञानकथालेखक. डार्विनच्या उत्क्रांतिवादाचा खरा समर्थक.
- लुई पाश्चरद्वारा १८८१ मध्ये अँथ्रॅक्स रोग प्रतिबंधक लशीचा सर्वप्रथम वापर.
- सिग्मंड फ्रॉइड, (१८५६) ऑस्ट्रियन वैद्यक, आधुनिक मानसशास्त्राचा जनक.
- लुई ड्युकाँकडून १८६९ मध्ये रंगीत चित्रणाद्वारा प्रकाशाच्या वर्णपटाचा सर्वप्रथम रंगीत फोटो.
- ॲथनी लव्हायशायर, (१७९४) फ्रेंच रसायनशास्त्रज्ञ. 'भ्रष्टाचारा'च्या आरोपाखाली देहदंडाची शिक्षा.
- अल्बर्ट मायकेलसन, (१९३१) जर्मन अमेरिकन पदार्थवैज्ञानिक, प्रकाशाच्या वर्णपटासंबंधी संशोधनाबद्दल नोबेल पारितोषिक.
- सर जगदीशचंद्र बोस या वनस्पतिशास्त्रज्ञाद्वारा १९०१ मध्ये लंडनच्या रॉयल इंस्टिट्यूटमध्ये सजीव आणि निर्जीव वस्तूंतील चेतनांसंबंधी प्रतिक्षिप्त क्रियांबाबत विवेचन करणारे व्याख्यान.
- रिचर्ड फेनमन, (१८१८) अमेरिकन पदार्थवैज्ञानिक क्वांटम इलेक्ट्रोडायनॅमिक्समधील संशोधनाबद्दल नोबेल पुरस्कार.
- 'अपोलो-१३' अमेरिकेचे अंतराळयान १९७० मध्ये तीन अंतराळवीरांसह चंद्राकडे झेपावले. प्राणवायूच्या टाकीची गळती झाल्यामुळे चंद्रावर न जाता ही मोहीम सोडून देण्यात आली.
- जेम्स फिलिप या इंग्लंडमधील ग्लूस्टर परगण्यातील बर्कले येथील आठ वर्षांच्या मुलाला १७९६ मध्ये सर्वप्रथम देवीची लस टोचली.
- पिअरे क्युरी, (१८५९) फ्रेंच पदार्थवैज्ञानिक, किरणोत्सारी पदार्थाच्या शोधासाठी मेरी क्युरी आणि हेन्री बेक्वेरेलसह नोबेल पारितोषिक.
- व्हेनेरा-५ मानवविरहित सोव्हिएत अंतराळयान १९६९ मध्ये शुक्रावर उतरले.
- एडवर्ड जेन्नर, (१७४८) ब्रिटिश डॉक्टर, देवीवरील लस शोधून काढली.
- एडवर्ड बंकनर, (१८६०) जर्मन जीवरसायनशास्त्रज्ञ, आंबविण्याच्या क्रियेबाबत संशोधनासाठी नोबेल पारितोषिक.

- आंद्रे साखारॉव्ह, (१९२१) सोविएत पदार्थवैज्ञानिक. हैड्रोजन बाँबचा जनक. पुढे अण्वस्त्रप्रसारबंदीच्या कार्यासाठी नोबेल पारितोषिक.
- 'अग्नी' या संपूर्ण भारतीय बनावटीच्या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्राची १९८९ साली यशस्वी चाचणी.
- कार्ल्स लिनेअस, (१७०७) स्वीडिश वनस्पतिशास्त्रज्ञ, वनस्पतींच्या दुहेरी नामकरणाची आंतरराष्ट्रीय पद्धत विकसित.
- निकोलस कोपनिकस, (१५४३) पोलिश खगोलविद. सूर्यकेंद्री विश्वाच्या संकल्पनेचा सिद्धान्त.
- पीटर झीमन, (१८६५) उच्च पदार्थवैज्ञानिक. विद्युत चुंबकीय 'झीमन परिणामा'चा जनक.
- बेंजामिन पॉल, (१९०६) भारतीय कृषिवैज्ञानिक. हरितक्रांतीत महत्त्वपूर्ण कामगिरी.
- जीन जुई डॉल्फ अगामिस, (१८०७) जीवशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, भूगर्भशास्त्र आणि जीवशास्त्रात संशोधन.
- २९ मे आर्थर एडिंग्टन आणि सहकाऱ्यांद्वारा १९१९ मध्ये खग्रास सूर्यग्रहणात पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षणामुळे होणाऱ्या प्रकाशाच्या किरणाचा शोध.
- जगदीशचंद्र बोस, (१८५०) भारतीय वनस्पतिशास्त्रज्ञ आणि पदार्थवैज्ञानिक. जगातील पहिल्या बिनतारी संदेशाचे प्रसारण.
- जॅक्स मोनार्ड (१९७६) फ्रेंच जीवरसायनशास्त्रज्ञ. एमआरएनएच्या शोधाबद्दल नोबेल पारितोषिक.

**संकलित**

●●●

## काही नोंदी
## साहित्य-चित्रपटाशी संबंधित

- जादूई वास्तववादी साहित्यिक गॅब्रिअल मार्क्वेझ यांचे १८ एप्रिलला निधन झाले. 'वन हंड्रेड इअर्स ऑफ सॉलिट्यूड' या त्यांच्या कादंबरीने खपाचा विक्रम केला. १९८२ साली त्यांना नोबेल पुरस्काराने गौरवण्यात आले.
- भालचंद्र नेमाडे यांच्या 'कोसला' कादंबरीनं नुकतीच पन्नाशी पूर्ण केली. एकच कादंबरी सतत पन्नास वर्षं चर्चेत राहण्याचं उदाहरण तसं विरळाच; पण कोसलाच्या बाजूनं आणि विरोधातही मराठीत सतत चर्चा होत राहिली आहे.
- चित्रपटांतील योगदानाबद्दल हिंदी चित्रपटसृष्टीतील संवेदनशील दिग्दर्शक, कवी आणि गीतकार गुलजार यांना नुकताच दादासाहेब फाळके पुरस्कार जाहीर झाला आहे.

**संकलित**

●●●

**कधी काळी गमतीचा भाग असलेलं नेट शॉपिंग आता गरज बनू पाहत आहे. दुकानात जाऊन निरखून पारखून वस्तू घेण्याचा प्रकार मागे पडून, आता नेटवरच्या दर्शनावरच भरवसा ठेवून बिनदिक्कत मोठमोठं नेट शॉपिंग केलं जात आहे.**

## *ध्यानीमनी ते स्वप्नी*

एका रामभक्ताला सर्वत्र ''राम'' दिसायचा. एकदा बगिच्यात बसला असतानाही ''राम'' दिसला. ध्यानीमनी ते स्वप्नी - स्वप्नातील राम बाग

रामा, तुझेच आतां मी भक्तिगीत गाते ।।
स्वप्नातल्या फुलांची, भावांजली वहाते ।।धृ ।।

स्वप्नांत पाहिला मी 'कमलादलांत' राम
कर्तव्य, न्याय यांची सीमा करी विराम
त्यागांत गंध भरला, 'नव मोगरा' बहरला
प्रेमास पूर आला, ओथंबुनि निघाला ।।१ ।।

सुकुमार जानकी ही, 'जाई' पवित्र ठरली,
सती धर्म पाळुनीही, भूमीत ज्योत जगली,
काटेरी हा 'गुलाब' सलतो सदैव जीवनी
लवांकुश वीर घडले, 'सूर्यफूल' भास्कराने ।।२ ।।

चारित्र्य तेज बरसे रघुवंशी नीतिधारा,
चिरंजीव मारुती ही सेवा करी पहारा,
बागेतुनीच येते, गंधासहित नाम,
माळेतुनी निनादे, सीतापती श्रीराम ।।३ ।।

पुरुषार्थी ज्येष्ठ राम, कोदंडधारी राम।
बंधूस प्रिय राम, 'मैत्रि'त श्रेष्ठ राम
श्रीराम जयजयराम, हा मंत्र गुच्छ करीते,
रामायणास माझी भावांजली वहाते ।।४ ।।

श्रीराम जयजयराम, श्रीराम जयजयराम ।।
श्रीराम जयजयराम, श्रीराम जयजयराम ।।

**वसुमती वझे**
पुणे

●●●

## *थोडी खंत*

बंधुभगिनींनो,

आपण सारे एकत्र येऊ या, राम उत्सवी जमून, स्मृतींना आळवू या ।।

भारतीयांनी स्वातंत्र्याचा लढा लढविला,
''चले जाव'' हा मंत्र जिभेवर खेळविला,
प्रजासत्ताक राज्यपद्धती सर्वधर्म पाळला,
शांती, बुद्धी, वैभवाचा तिरंगा फडकवला ।।१ ।।

देशभक्ती, नीती, श्रद्धा मनोमनी ठसली,
शूर सिंहाची 'राजमुद्रा' दप्तरी भूषविली,
सुवर्ण महोत्सवी सुभाष स्मृतीही जयहिंद चैतन्य
गांधी, गोखले, नेहरू, सावरकर, टिळक लोकमान्य ।।२।।

''वंदे मातरम्'' मंत्र शक्तीचा भारतभूमीत
हुतात्म्यांची जिवंत कमळे फुलली पाण्यात
राष्ट्रभक्तीचे दीप विझले, काळ्या ज्योतीत,
तरुण पिढीचे गुलाब गळले, अकाली मातीत ।।

रामा, हे मंतरलेले दिवस संपले. आता सद्यःपरिस्थिती काय आहे? सर्व नीतिमूल्ये नाहीशी झाली आहेत.
रंगही विटला जळे पालवी, षड्रिपु अग्नीत,
देशभक्ती ही गेली कोठे भ्रष्टाचारांत!

सध्याचा हा काळ बदलला निर्जीव रामबाण
अनीती आणि अन्याय हो, वैभवाची खाण.
वेळ ना कोणा राष्ट्रकहाणी, वदण्या नि ऐकण्या,
काळ असे गतिमान जीवनी, देशा उद्धरण्या ।।

कसे करावे, काय करावे, विचार हा मांडण्या,
राम उत्सवी आपण जमू या, हे कोडे सोडविण्या
हे कोडे सोडविण्या, हे कोडे सोडविण्या ।।

**वसुमती वझे**
पुणे

●●●

# परिसर वार्ता

**– संकलित**

## जोशी बेडेकर महाविद्यालय

### तत्त्वज्ञान विभाग

तत्त्वज्ञान विभाग आणि रिसर्च सेन्टरच्या विद्यमाने आंतर महाविद्यालयीन विद्यार्थी परिषदेचे आयोजन केले होते. यात Surrogate Motherhood, Pornography and Censorship बौद्धांचे तत्त्व, जैनांचे तत्त्वज्ञान, आंबेडकरांचे सामाजिक विचार, गांधींचे civil disobedience and shit projna इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध सादर केले. मुंबईतील आठ महाविद्यालयांतील १७ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला होता. डॉ. तबस्सुम शेख (सहकारी प्राध्यापक; तत्त्वज्ञान विभाग-प्रमुख, जी. एन. मोमीन महाविद्यालय, भिवंडी) आणि महाविद्यालयाच्या प्राध्यापिका सुचित्रा नाईक यांनी परीक्षक म्हणून भूमिका पार पाडली. विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देण्यात आले.

Financial Market तर्फे "Information on NSES' NCFM Certification Courses" या विषयावर श्री. संदीप (Director of Rupee Sid. Financing) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

Financial Markets Stream and M. Com (Banking & Finance) तर्फे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. Mutual Funds a career ahead by 1) Shri Yogesh Sharma -V. P. Baroda Pioneer Mutual Fund Co. 2) Financial Planning & A way ahead by Shri Kirtan Shah & Director Ambition learning solutions. 3) Career Opportunities in Credit Research and capital markets (CAP CFA CCRA) by Shri Priyesh Karia, Director Ambition Learning Solutions. इत्यादी विषयांवर तीन विभागांत चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

**स्टुडन्टस् फोरम** – महाविद्यालयातील स्टुडन्टस् फोरम या समितीतर्फे विविध विषयांवर विद्यार्थ्यांमध्ये चर्चा घडवून आणल्या जातात. चर्चासत्र झालेले विषय होते.

- Human rights related to Women rights याअंतर्गत भारत, नायजेरिया, इजिप्त इत्यादी देशांतील स्त्रियांचे राजकीय, शैक्षणिक प्रबोधनी आणि त्यांचे अधिकार इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी साधक-बाधक चर्चा केली.
- **वादविवाद** – Is the 'आप' Kind of Politics a viable option in India? या विषयावर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला सिंह महोदया यांच्या मार्गदर्शनाखाली वाद-संवाद रूपात चर्चा केली.

### अर्थशास्त्र विभाग

अर्थशास्त्र विभागाकडून आंतर महाविद्यालयीन विद्यार्थी परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. Financing of BOP deficits, FDI and MNC, foreign Portfolio, inverstment, Emerging Trends in Indian BOP position, WTO Function and Agreement and market structures इत्यादी विषयांवर विद्यार्थ्यांनी शोधनिबंध सादर केले.

### हिंदी विभाग

हिंदी विभागातर्फे 'Unicode and Hindi' या विषयावर आंतर महाविद्यालयीन एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले होते. ठाण्यातील विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा यात सहभाग होता. श्री. राजेन्द्र वर्मा (Deputy Director, Rajbhasha Ayog, Pune) यांच्या माहितीपूर्ण PPT द्वारे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली.

कार्यशाळेच्या यशस्वितेकरता महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शकुंतला ए. सिंह यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. सुभाष शिंदे व डॉ. एस.व्ही. भिडे यांचेही सहकार्य प्राप्त झाले. तसेच विभागप्रमुख डॉ. अनिल ढवळे व सहाध्यापिका डॉ. जयश्री सिंह यांनीही कार्यशाळेसाठी अथक प्रयत्न केले. महाविद्यालयाच्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या अध्यापिका सौ. संध्या वैद्य यांना महाराष्ट्र पुरोगामी मुस्लीम संघटनेतर्फे ‘विद्या तेजस्विनी’ हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

**१) प्रात्यक्षिक परीक्षा**

वि. प्र. मं. चे टी.एम.सी. विधी महाविद्यालयाने प्रथम द्वितीय व तृतीय विधीच्या प्रात्यक्षिक परीक्षेत नापास झालेल्या व गैरहजर विद्यार्थ्यांसाठी दिनांक १ आणि १६ एप्रिल २०१४ रोजी पुनः परीक्षा घेतली.

२) महाविद्यालयामध्ये प्रथम, तृतीय व पाचव्या सत्राच्या विद्यापीठाच्या परीक्षा १९ एप्रिलपासून सुरू झाल्या होत्या.

**३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**

महाविद्यालयाच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने डॉ. आंबेडकरांची एक तसबीर महाविद्यालयास भेट म्हणून दिली. या वेळी विद्यार्थ्यांना मिठाई वाटण्यात आली व सर्वांनी डॉ. आंबेडकरांप्रति आपला आदर व्यक्त केला.

**४) १० वा स्मृतीदिन**

वि.प्र.मं. चे संस्थापक श्री. व्ही. एन. बेडेकर यांच्या दहाव्या स्मृतिदिनानिमित्त दि. १४ एप्रिल रोजी त्यांना आदरांजली वाहण्यात आली. या वेळी मंडळाच्या वतीने प्रा. बी. के. पासी यांचे ‘‘सामूहिक अध्ययन, सुसंस्कृत समाजनिर्मितीचे एक साधन’’ या विषयावर व्याख्यान झाले.

**५) राष्ट्रीय चर्चासत्र**

जी. जे. अडवानी विधी महाविद्यालय, वांद्रे, मुंबई आयोजित ‘‘पारंपरिक समाजातील महीब – एक आव्हान’’ या विषयावरील राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या श्रीमती श्रीविद्या जयाकुमार यांनी भाग घेतला. दिनांक २६ एप्रिलला झालेल्या दुपारच्या सत्रामध्ये श्रीमती जयाकुमार यांनी 'Empowerment and Media' या विषयावर सहअध्यक्ष म्हणून बाजू मांडली.

**६) कारागृह भेट**

दिनांक २६ एप्रिल २०१४ रोजी महाविद्यालयातील प्रा. मिथुन बनसोडे, ॲड. वैद्य, ॲड. गांधी यांच्यासह एकूण ३५ विद्यार्थ्यांनी ठाणे कारागृहाला भेट दिली. या वेळी विद्यार्थ्यांना काराग्रहाविषयी विविध कायदेशीर माहिती देण्यात आली.

७) विद्यापीठाच्या प्रथम, तृतीय व पाचव्या सत्राचे पेपर तपासणीचे काम महाविद्यालयामध्ये सुरू करण्यात आले.

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन–अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**– संपादक**

# जाहीर आवाहन

➢ **विद्या प्रसारक मंडळ :–** विद्या प्रसारक मंडळ १९३५ सालापासून गेली ७८ वर्षे ठाण्यात शैक्षणिक प्रसाराचे कार्य करीत आहे. १९३२ साली सुरू झालेल्या नौपाड्यातील एका प्राथमिक शाळेच्या वाढीसाठी मंडळाने १९३५ पासून कार्याला सुरुवात केली. स्वतःच्या मालकीची जागा शाळेसाठी संपादन करून शाळेचे रूपांतर माध्यमिक शाळेत केले. इंग्रजी माध्यमाची शाळाही १९७६ पासून मंडळ चालवीत आहे. १९६९ मध्ये ठाण्यात पहिले महाविद्यालय स्थापन झाले. कला, वाणिज्य, विज्ञान आणि विधी या विभागांसाठी स्वतंत्र महाविद्यालये, तांत्रिक शिक्षणासाठी तंत्रनिकेतन व व्यवस्थापन शिक्षणासाठी व्यवस्थापन संस्था चालू केल्या. वरील शैक्षणिक विभागांतर्फे अनेक अभ्यासक्रम राबवले जातात. वरील सर्व शैक्षणिक विभागांसाठी स्वतंत्र इमारतीची सोय केली आहे. वरील सर्व शैक्षणिक विभागांत आजमितीस सुमारे १७००० विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेत आहेत. मंडळाने २०१२ पासून नवीन आधुनिक दर्जाचे अभियांत्रिकी महाविद्यालय कोकणात सुरू केले आहे.

➢ **मंडळाची शैक्षणिक प्रसारासाठी कोकण परिसराची निवड** : एका बाजूला समुद्रकिनारा व दुसऱ्या बाजुला सह्याद्रीच्या रांगा यांच्यामधील या पट्ट्यातील जनता गेली सुमारे ४०० वर्षे उत्पादनक्षमता नसल्यामुळे जगण्यासाठी झगडत आहे. पर्यटन व्यवसाय हाच काय तो व्यवसाय त्यांना थोडीफार साथ देत आहे.

कोकणातल्या रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यांचे साक्षरतेचे प्रमाण चांगले आहे तरीसुद्धा उच्च शिक्षणामध्ये दोन्ही जिल्हे मागास म्हणून गणले जातात आणि त्याचे कारण म्हणजे येथील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या मिळत असलेल्यास संधीअभावी विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे कमी वळतात हे आहे. २००७ साली दिल्लीच्या विद्यापीठ अनुदान आयोगाने स्थापन केलेल्या एका समितीने संपूर्ण देशभर या विषयावर सर्वेक्षण करून आपला अहवाल सादर केला होता. त्या अहवालात संपूर्ण देशात ज्या भागांमध्ये पुढे येण्याची प्रवृत्ती दिसत नाही, अशा भागांत आधुनिक धर्तीवर महाविद्यालये मोठ्या संख्येने निर्माण झाली पाहिजेत असे मत मांडले होते. भारताची उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांची सरासरी फक्त १२.४ टक्के आहे. त्या समितीला असेही आढळून आले की ५९३ जिल्ह्यांपैकी ३७४ जिल्हे असे आहेत की त्या ठिकाणी उच्च शिक्षणासाठी काहीच सोयी नाहीत. महाराष्ट्र राज्यात उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेणाऱ्यांच्या टक्केवारीचे प्रमाण १७.३३ टक्के असून रत्नागिरी जिल्ह्याची उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची टक्केवारी सर्वांत कमी म्हणजेच फक्त ८ टक्के आहे.

उच्च शिक्षण देणाऱ्या ७० टक्के संस्था एक तर मोठ्या शहरांत किंवा नागरी भागात आहेत. याचे मुख्य कारण तेथील विद्यार्थ्यांना खर्चीक उच्च शिक्षण घेणे परवडते व शिक्षणासाठी आवश्यक शिक्षकवर्गही उपलब्ध होतो. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी मोठ्या शहरांतील महाविद्यालयांमध्ये जावे लागते. यावर उपाय एकच, की अशा प्रकारच्या संस्था आणि उच्च दर्जाचे शिक्षण देणारी महाविद्यालये ही ग्रामीण भागात काढली जावीत. यासाठी आवश्यक त्या मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करणे व त्यासाठी लागणारा खर्च करणे यांची पूर्तता करावी लागते. त्यामुळे गरजू व हुशार ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय तर होईलच, पण त्या ग्रामीण भागाचा मोठ्या प्रमाणावर विकासही घडून येईल. तिथल्या लोकांचा फायदा व गरजूंना कामधंदे उपलब्ध होतील आणि त्या ग्रामीण भागाचे महत्त्वही वाढेल.

➢ **विद्या प्रसारक मंडळाच्या नवीन प्रकल्पाविषयी :–** मंडळाच्या शाळा व महाविद्यालयीन शैक्षणिक अभ्यासक्रमांचा विस्तार करण्याच्या दृष्टीने व कोकण परिसरासाठी उत्तम शैक्षणिक संस्थांची गरज लक्षात घेऊन संस्थेने आता आपले शैक्षणिक उपक्रम कोकणात राबवण्याचे ठरवले असून त्या दृष्टीने गुहागरजवळील वेळणेश्वर, येथे सुमारे ६० एकर जागा घेतली असून त्याचा पहिला टप्पा ३५ एकर जागेमध्ये कार्यान्वित करण्यात आला आहे. या अभियांत्रकी महाविद्यालयास विद्या प्रसारक मंडळाचे महर्षी परशुराम अभियांत्रिकी महाविद्यालय असे नामकरण करण्यात आलेले आहे. सदर महाविद्यालयास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, दिल्ली आणि तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, यांची मान्यता मिळाली असून मुंबई विद्यापीठाची संलग्नताही प्राप्त झाली आहे. दिनांक ६-८-२०१२ रोजी महाविद्यालयाचा उद्घाटन समारंभ पार पडला व त्या दिवसापासून शैक्षणिक वर्ष २०१२-२०१३ ची

सुरुवात झाली. या महाविद्यालयामध्ये मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इन्स्ट्रुमेंटेशन, इलेक्ट्रॉनिक्स अॅण्ड टेलिकम्युनिकेशन, कॉम्प्युटर व सिव्हिल या सहा अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमांसाठी प्रथम व द्वितीय वर्ष मिळून ३२६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून महाविद्यालय नियमितपणे सुरू आहे.

या महाविद्यालयाच्या संकुलामध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या ६ शैक्षणिक इमारती, १० वसतिगृहे, १० शिक्षकनिवासस्थाने, २ अतिथिगृहे, संस्था कार्यालय/सभागृह/ उपाहारगृह, बँक/टपाल कार्यालय/स्टेशनरी दुकान/ केशकर्तनालय/दवाखाना अशी एक बहुउद्देशीय इमारत, आधुनिक व्यायामशाळा/बॅडमिंटन कक्ष/ बंदिस्त खेळागृह, विद्युत पुरवठा इमारत (Sub-Station), केंद्रीय संगणक नियोजन इमारत (सर्व्हर रूम), मल:नित्सारण प्रक्रिया केंद्र (STP), ९ लाख लीटरची भूमिगत व ५ लाख लीटरची जमिनीवरील टाकी, प्रवेशद्वार व देखभाल करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी एक इमारत अशा सुमारे ३७ इमारतींचे ६,००,००० चौ. फूट क्षेत्रफळाच्या बांधकामाचा कल्पकतने केलेला मंजूर आराखडा आहे. संपूर्ण परिसर अनेक शोभिवंत झाडे व हिरवळीने सुशोभित करण्यात येत आहे. हा सर्व परिसर काचतंतू (Fibre-Optic) च्या जाळ्याने जोडलेला असून बिनतारी (WiFi) प्रक्षेपण उपलब्ध असेल. या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या सर्व सोयी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या असून याचे उद्दिष्ट उत्कृष्ट गुणवत्ता हेच आहे.

मंजूर आराखड्यापैकी पहिल्या टप्प्यातील २१ इमारतींचे बांधकाम हाती घेतले आहे. त्यांतील १८ इमारतींचे बांधकाम १०० टक्के पूर्ण झाले आहे व तीन इमारतींचे बांधकाम या महिनाअखेर पूर्ण करावयाचे आहे. उर्वरित इमारतींचे बांधकाम निधी उपलब्धतेनुसार करण्याचे ठरवले आहे.

➢ **देणगी व मूदत ठेवीसाठी आवाहन** : हे अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्याकरता दोन टप्प्यातील बांधकामे, रस्ते, शैक्षणिक साधने, संगणक व तत्सम सुविधा, पुस्तके, वैज्ञानिक साधनसामुग्री फर्निचर, सौरऊर्जा साधने व इतर सोयीसुविधा इत्यादींवरती रु.१५० कोटी खर्च अपेक्षित असून आजपर्यंत जवळपास ७० कोटी रुपये खर्चाचे बांधकाम झाले आहे. एकूण झालेल्या खर्चापैकी ४४ कोटी बँकेकडून कर्ज घेऊन केले आहे तर उर्वरित रु.२६ कोटी मंडळाच्या उत्पन्नातून व लोकांकडून स्वीकारलेल्या वैयक्तिक ठेवींतून खर्च केले आहेत. बँकेकडून अजून कर्ज मिळणे अशक्य असल्यामुळे राहिलेले पहिल्या टप्प्यातील काम करण्यासाठी अंदाजे १० कोटी खर्चाची तरतूद मंडळालाच करावयास लागणार आहे. मंडळाला दानशूर, समाजसेवक, उदार मताच्या व्यक्तीना यांच्याकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीशिवाय दुसरा कोणताही उत्पन्नाचा मार्ग नाही. तुटपुंज्या फीच्या उत्पन्नामध्ये अशी नवीन महविद्यालये निर्माण करणे शक्य नाही आणि म्हणून या सर्व बांधकामासाठी लागणारा आर्थिक पुरवठा बँकांकडून कर्ज घेऊन व जनतेकडून देणगी स्वरूपात मदत घेऊनच करण्यात येतो.

नियोजित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बांधकामासाठी बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाव्यतिरिक्त लागणारा निधी उपलब्ध करण्याकरता रु.१० कोटींपर्यंत खालील अटींवर वैयक्तिक ठेवी स्वरूपात निधी गोळा करण्यास धर्मादाय आयुक्तांकडून खालील अटरंचा रीतसर परवानगी घेतली आहे.

**अटी**

१. संस्थेकडे ठेवण्यात येणाऱ्या ठेवी या कमीत कमी रु. ५,०००/- वा त्याच्या पटीत स्वीकारण्यात येतील.

२. सदर ठेवींचा कालावधी ५ ते १० वर्षांचा असेल व किमान ३ वर्षांपर्यंत ठेव परत केली जाणार नाही.

३. ठेवीसाठी वारसदार नेमणे आवश्यक असेल.

४. ठेवीच्या कालावधीत ठेवीदाराचा मृत्यू ओढवल्यास वारसदारास पंधरा दिवसांत ठेव परत करण्यात येईल.

५. सदर ठेवीवर दर साल दर शेकडा ५% किंवा राष्ट्रीयीकृत बँकांच्या प्रचलित व्याजदरांना समांतरत अशा सरळ व्याजदराने प्रत्येक वर्षाच्या मार्च महिन्याच्या अखेरीस व्याज देण्यात येईल

६. काही अपरिहार्य कारणामुळे मुदतीपूर्वी ठेव मोडवयाची असल्यास ठेवीदाराने तीन महिन्यांची आगाऊ सूचना देणे आवश्यक असेल.

या आवाहनाद्वारे आम्ही आपणांस विनंती करतो की आपण अशा सामाजिक व शैक्षणिक कार्यास देणगी किंवा मुदत ठेवीच्या स्वरूपात मदत करावी व मंडळाच्या या राष्ट्रीय स्वप्नपूर्तीस हातभार लावावा.

अधिक महितीकरता या अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या www.vpmmpcoe.org या संकेतस्थळावर भेट द्यावी.

आपला विश्वासू,

**डॉ. विजय वासुदेव बेडेकर**
कार्याध्यक्ष,
विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णुनगर, नौपाडा, ठाणे ४००६०२.
दूरध्वनी : ०२२-२५४२६२७०


भारतातील महान गणितज्ज्ञ व खगोलशास्त्रज्ञ भास्कराचार्य यांच्या सन्मानार्थ ठाणे येथील विद्या प्रसारक मंडळ या संस्थेने त्यांचे ९०० वे जन्म वर्ष साजरे करायचे ठरविले आहे. त्या निमित्ताने तीन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे.

अनेक पिढ्या ज्योतिषशास्त्राची परंपरा असणाऱ्या विद्वान कुटुंबात भास्कराचार्यांचा इ.स. १११४ साली जन्म झाला. सर्व ज्ञानशाखांत नैपुण्य मिळवत त्यांनी गणित व खगोलशास्त्राच्या साहित्यात मोलाची, महत्त्वाची भर टाकली. विषयाची परिपूर्ण हाताळणी, साहित्याचे विचारपूर्ण संगठन केले आणि विषय स्पष्टपणे मांडले, ज्याचा येणाऱ्या शतकांतील विषयांच्या विकासावर प्रभाव पाहावयास मिळतो. भास्कराचार्यांच्या साहित्याचा सर्व देशांत अभ्यास केला जातो व त्यावर अनेक प्रकारचे टीकात्मक व अभ्यासपूर्ण साहित्य निर्माण केले जाते.

# भास्कर ९००

## आंतरराष्ट्रिय परिषद

## भास्कराचार्यांच्या ९०० व्या जन्म वर्षनिमित्ताने

विबुधाभिवन्दितपदो जयति श्रीभास्कराचार्यः

**शुक्रवार दि. १९; शनिवार दि. २० आणि रविवार दि. २१ सप्टेंबर २०१४**

स्थळ :
थोरले बाजीराव पेशवे सभागृह,
ज्ञानद्वीप, ठाणे महाविद्यालय परिसर,
चेंदणी, बंदर रोड, ठाणे, महाराष्ट्र, भारत – ४०० ६०१

**http://www.vpmthane.org/bhaskara900/**

भास्कर ९००

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## ❋ संपर्क ❋

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.